जीवन मार्ग

संस्थापक : आर. बी. मोरे

संपादक
डॉ. अशोक ढवळे

संपादक मंडळ
कुमार शिराळकर
डॉ. विठ्ठल मोरे
अजित अभ्यंकर
सुभाष थोरात
डॉ. रमेशचंद्र पाटकर
राजीव देशपांडे
शोभा ठेकेदत्त
डॉ. उदय नारकर

मुद्रक/प्रकाशक
डॉ. अशोक ढवळे

अक्षरजुळणी
आत्माराम पडवळ

मुखपृष्ठ व मांडणी
केतन शिंदे

व्यवस्थापक
चंद्रकांत शिंदे

प्रसिद्धी स्थळ
'जनशक्ती', पी. बी. मार्ग
वरळी, मुंबई - ४०० ०१३
फोन : ०२२-२४९५१५७६
फॅक्स : ०२२-२४९६१५२५
ई मेल : mahacpim@gmail.com

# तृणमूलच्या राज्यात महिलांवरील अत्याचारांच्या सर्व सीमा ओलांडल्या!

*(महिला कार्यकर्तीवर सामूहिक बलात्कार करून हत्या केली; आणि नंतर गळ्याला फास लावून लटकावले)*

**विशेष**

कांथीत सीपीआय(एम)च्या महिला कार्यकर्तीवर झालेला सामूहिक बलात्कार व त्यानंतरच्या हत्येमुळे संपूर्ण बंगालमध्ये संतापाची लाट उठली आहे. पूर्व मिदनापूरमधील कांथी येथील सूनिया या गावातील तृणमूल काँग्रेसच्या गुंडांच्या या अधम दुष्टकृत्याविरोधात राज्यातील जनता मोठ्या प्रमाणात रस्त्यावर उतरत आहे.

पूर्व मिदनापूर प. बंगालमधील अशा जिल्ह्यांपैकी आहे, जेथे सत्ताधारी तृणमूल काँग्रेसच्या गुंडांच्या दहशतीचे राज्य सर्वात भयावह स्वरूपात चालू आहे. गेल्या तीन वर्षांपासून या जिल्ह्याच्या मोठ्या भागाला सीपीआय(एम) व डाव्या आघाडीच्या कार्यकर्त्यांवरील दहशतीने 'प्रतिबंधित क्षेत्र' बनवून टाकले आहे. शेकडो कार्यकर्त्यांना आपल्या गावांमधून हुसकावून लावण्यात आले आहे. कांथी उपविभागांतर्गत असलेले सूनिया हे गावही यात मोडते, जेथून सीपीआय(एम)च्या कार्यकर्त्यांना हुसकावून लावण्यात आले आहे. या कार्यकर्त्यांना आपल्या गावात किंवा घरी परत येणे म्हणजे जीव जोखमीला लावण्यासारखेच आहे.

सूनियाचे रहिवाशी व सीपीआय(एम)च्या लोकल कमिटीचे सदस्य ब्योमकेश गिरी, त्यांचा पुत्र व भाऊ यांनासुद्धा जीव वाचविण्यासाठी गाव सोडावे लागले होते. ते गावापासून लांब वेगवेगळ्या ठिकाणी रहात होते. गिरींचा पुत्र यावर्षी १२वीची परीक्षा देऊ शकला नाही. या लोकांचं घरी पोहचणं म्हणजे सरळ सरळ जीव धोक्यात आणण्यासारखे होते. तिकडे गिरींची पत्नी, त्यांचे वयोवृद्ध वडिल आणि कुटुंबातील काही सदस्य गावातल्या त्यांच्या घरातच रहात होते.

गिरींची पत्नी गीताली (नाव बदलले आहे) अंगणवाडी कार्यकर्ती होती आणि यांद्वारे मिळणाऱ्या अल्प मानधनावर कशीबशी घरगाडा चालवत होती. अंगणवाडी कार्यकर्ती म्हणून काम करत असताना आपल्या चांगल्या कामामुळे ती त्या भागात लोकप्रिय होती व जनवादी महिला संघटनेची आणि पक्षाची क्रियाशील कार्यकर्ती होती.

गेल्या अनेक दिवसांपासून तृणमूलचे कार्यकर्ते तिला सारखे धमकावित होते की, तिच्या नवऱ्याला तिने गावात परत बोलवावे. आपल्या पतीला गावात परत बोलावणे म्हणजे त्याला मृत्यूच्या दाढेत ढकलणे हे तिला माहीत असल्यामुळे तिने ते मान्य केले नाही. यानंतर मागील काही दिवसांपासून



तृणमूलच्या गुंडांनी तिने १२ लाख रुपयांचा दंड भरावा म्हणून दबाव आणणे सुरू केले होते. गीतालीने त्यांना विनंती केली की, एवढी मोठी रक्कम ती कोणत्याही परिस्थितीत जमा करू शकत नाही.

१५ ऑगस्टला जेव्हा संपूर्ण देशात स्वातंत्र्य दिनाच्या कार्यक्रमाचा जल्लोष सुरू होता तेव्हा तृणमूलच्या गुंडांनी कथित दंड वसूल करण्यासाठी गीतालीला जबर मारहाण केली. तृणमूलची मनमानी व अत्याचार सहन करण्यापलिकडे झाल्यावर तिने गावातून पळून जाण्याचा प्रयत्न केला. परंतु त्या बदमाशांनी तिला मध्येच पकडले व परत एकदा जबर मारहाण केली. तिचे कपडे फाडण्यात आले आणि त्याच अवस्थेत तिला गावात फिरवण्यात आले. परंतु तरीही तिच्यावरील अत्याचार थांबले नाहीत.

१७ ऑगस्टच्या रात्री तृणमूलचे गुंड जबरदस्तीने तिच्या घरात घुसले. दुसऱ्या दिवशी सकाळी तिच्या नातेवाईकांना व शेजाऱ्यांना तिचा मृतदेह गळ्यात फास असलेल्या अवस्थेत मिळाला. परंतु मरणाऱ्या व्यक्तीचे पाय जमिनीवर टेकले होते. यातून हे निदर्शनास येत होते की, मृत्यूनंतर मृतदेहाला गळफास अटकवण्यात आला होता.

त्वरित पोलिसांना खबर देण्यात आली. संपूर्ण घटनाक्रमामुळे गावकऱ्यांमध्ये मोठा संताप होता. परंतु तृणमूलच्या नेत्यांबरोबर मिलीभगत असणाऱ्या पोलिसांनी मृत महिलेचा दीर व त्याच्या पत्नीला या घटनेची 'आत्महत्या' म्हणून नोंद करून पोलीस रिपोर्ट लिहिण्यास भाग पाडले. पण पोलिसांची ही चाल यशस्वी झाली नाही. पीडीतेच्या परिवाराने कांथी पोलीस स्टेशनात बलात्कार व हत्येचा गुन्हा दाखल केला.

घटनेची माहिती मिळाल्यावर गीतालीचे पती कांथी पोलीस स्टेशनवर पोहोचले व त्यांनी आरोप केला की, पोलिसांना अगोदरच तृणमूल कार्यकर्ते गीतालीला त्रास देत असल्याची माहिती देण्यात आली होती. परंतु पोलिसांनी कोणतीही कारवाई केली नाही. मृत महिलेच्या परिवाराने या घटनेतील अपराध्यांची नावेसुद्धा लिहून दिली आहेत. ज्यात सर्व तृणमूल काँग्रेसचे कार्यकर्ते आहेत.

सीपीआय(एम)चे प्रमुख कार्यकर्तेही पोलीस स्टेशनवर पोहोचले. मृतदेह घेऊन लोकांनी रस्ते रोखून धरले. शेवटी पोलिसांना हत्येचे प्रकरण दाखल करावे लागले. परंतु पोलीस व प्रशासन यांची अमानवीपणाची शृंखला यानंतरही थांबली नाही. मृत महिलेच्या परिवाराला तिचे शव गावी नेण्यासाठी त्यांनी परवानगी दिली नाही.

१९ ऑगस्टला पोलीस प्रशासनाने संपूर्ण घटनेला 'आत्महत्ये'चे रूप देण्याचा प्रयत्न केला. तृणमूल काँग्रेसच्या तीन कार्यकर्त्यांना आत्महत्येला प्रवृत्त करण्याच्या आरोपावरून अटक करून ताब्यात घेतले. सत्ताधारी पक्षाचे गुंड आणि पोलिसांची मिलीभगत असल्याचे यासारखे दुसरे निर्लज्ज उदाहरण नसेल.

सर्व साक्षीदार व उपस्थित यांच्या जबावावरून असे निदर्शनास येते की, सामूहिक बलात्कारानंतर तिची हत्या करण्यात आली आणि त्यानंतर त्याला आत्महत्येचे रूप देण्यासाठी, मृतदेहाच्या गळ्यात फास टाकून लटकावून देण्यात आले

१९ ऑगस्टलाच जनवादी महिला संघटना व सीपीआय(एम)चे नेते सूनियामधील मृत महिलेच्या घरी गेले. त्यांनी शोकाकुल परिवाराला धीर देण्याचा प्रयत्न केला. गावकऱ्यांनी या नेत्यांना मृत महिलेला दिलेल्या यातनांबद्दल सांगितले. तिकडे तृणमूलच्या गुंडांनी सूनियापर्यंत पोहोचणारे रस्ते तोडून उध्वस्त केले व राजकीय-सामाजिक कार्यकर्ते या गावापर्यंत पोहोचू शकणार नाहीत असा प्रयत्न केला.

सीपीआय(एम)चे राज्य सचिव बिमान बसूंनी या अमानुषतेचा निषेध केला व या विरोधात संपूर्ण बंगालमध्ये निषेध आंदोलने आयोजित करण्याचे आवाहन केले. पूर्व मिदनापूरमध्ये अनेक ठिकाणी रस्ता रोको करून लोकांनी या घटनेचा निषेध केला. कोलकाता येथे जनवादी महिला संघटनेने ठिकठिकाणी रस्ता रोको केला. राज्यभरात अनेक जिल्ह्यांमध्ये हजारो लोकांनी रस्त्यावर उतरून या घटनेचा निषेध केला व मोर्चे काढले.

(अनुवाद : विजय पाटील)

पॉलिटब्यूरो निवेदन

# सीबीआय संचालकांच्या भेटी

सीबीआयने ज्यांची चौकशी केली आहे अशा व्यक्तींच्या भेटी सीबीआयचे संचालक रणजित सिन्हा आपल्या निवासस्थानी घेत आहेत असे वृत्त प्रसिध्द झाले आहे. हे वृत्त अस्वस्थ करणारे अनेक प्रश्न उपस्थित करीत आहे. काही व्यक्तींवर सीबीआयने आरोपपत्र दाखल केलेले आहे तर काही व्यक्तींचा भूतकाळ संशयास्पद आहे. अशा व्यक्तींना तपास यंत्रणेच्या प्रमुखाने भेटणे आणि तेही स्वत:च्या निवासस्थानी, हे अत्यंत अयोग्य आणि नियमबाह्य आहे. या प्रकरणाची उच्च पातळीवरून चौकशी होऊन योग्य ती कारवाई व्हावयास हवी.

४ सप्टेंबर २०१४

# काश्मीरमधील पूरसंकट

जम्मू आणि काश्मीमध्ये पुराने जो हाहा:कार उडवलेला आहे त्याबद्दल पॉलिटब्यूरो तीव्र चिंता व्यक्त करीत आहे. सतत कोसळणाऱ्या पावसामुळे आणि नद्यांचे पाणी धोकादायक पातळीपर्यंत वाढत असल्याने अनेक जिल्हे संकटात सापडले आहेत. अनेक मौलिक जीव गमावले गेले आहेत, माालमत्तेचे खूपच नुकसान झालेले आहे आणि जनावरेही मारली गेली आहेत. दोन्ही भागांत हजारो लोक बेघर झाले आहेत. जरी राज्य प्रशासनाने आणि लष्कराने लोकांना वाचविण्याचे काम हाती घेतले असले तरी खूप काही करण्याची गरज आहे. दक्षिण काश्मीरमधील काही खेडेगावे पाण्याखाली बुडून गेल्याच्या बातम्या आल्या आहेत. अशा ठिकाणी जीव वाचविण्यासाठी त्वरित बचावकार्य सुरू केले पाहिजे. केंद्र सरकारने पुरग्रस्त भागाला तातडीने मदत पुरविली पाहिजे. लोकांना त्यांच्या नुकसानीची संपूर्ण भरपाई मिळेल याची खात्री पटविली पाहिजे.

पुराच्या या संकटामुळे मृत्युमुखी पडलेल्या व ताटातूट झालेल्या कुटुंबियांच्या प्रती मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष अतीव दु:ख व सहानुभूती व्यक्त करीत आहे.

५ सप्टेंबर २०१४

# विमा क्षेत्रात ‘एफडीआय्’चा शिरकाव :
# अमेरिकेला आणि वित्तीय भांडवलाला खुश करण्याची कसरत

**सीताराम येचुरी**

भारत दौऱ्यावर आलेले अमेरिकेचे राज्य सचिव जॉन केरी यांच्या स्वागतार्थ मोदी सरकारने त्यांना एक उपहार देऊ केला आहे. उपहार आहे, विमा क्षेत्रात एफडीआय् (थेट विदेशी गुंतवणूक)ची मर्यादा २६ टक्क्यांवरून ४९ टक्क्यांपर्यंत वाढविण्यास, केंद्रीय मंत्रीमंडळाने दिलेली मंजुरी ! विमा कायद्यांतली ही दुरुस्ती संसदेच्या या सत्रातच मांडली जाईल. परिणामी युपीए, सरकारच्या कार्यकाळात स्थापन झालेल्या ‘इंडिया-युएस् बिझनेस फोरम’या संस्थेमार्फत वारंवार व्यक्त करण्यात आलेली एक दीर्घकालीन मागणी पूरी होईल.

वित्तीय क्षेत्र खुले करणे आणि या क्षेत्राचे उदारीकरण करणे ही नवउदारवादी-गटांच्या धोरणांमधील एक अत्यंत महत्त्वाची सुधारणा आहे. अनियंत्रित भांडवली प्रवाह, बँकींग क्षेत्र आणि विमा क्षेत्राचे खाजगीकरण, या दोन्ही क्षेत्रांमध्ये थेट विदेशी गुंतवणूक आणि वित्तीय भांडवल आणि वित्तीय नव्या वस्तू-‘साधिते’ खुल्या करणे, इत्यादी सुधारणांचा, नवउदारवादी धोरणात समावेश आहे.

विमा क्षेत्राच्या बाबतीत, १९९९ साली वाजपेयी सरकार सत्तेवर असताना ‘इन्श्युरन्स रेग्युलेटरी डिव्हलपमेंट अ‍ॅथॉरिटी अ‍ॅक्ट’ पारित झाला होता. या कायद्यामुळे विमाक्षेत्रात खाजगीकरणाला आणि २६ टक्के एफडीआय्ला शिरकाव करणे शक्य झाले. तेव्हापासून एफडीआय्ची कमाल मर्यादा ४९ टक्क्यापर्यंत वाढविण्यासाठी दबाव आणला जात होता. डाव्या पक्षांचा या चालीला विरोध होता आणि त्यांनी युपीए, सरकारला या बाबतीत अटकाव केला होता. डाव्या पक्षांनी आपला पाठिंबा काढून घेतल्यानंतर युपीए-१ सरकारने हे विधेयक २००८ साली राज्यसभेमध्ये मांडले. परंतु सरकारला हे विधेयक युपीए-२ सरकारच्या कारकीर्दीत पारित करता आले नाही. ‘वित्तीय स्थायी कमिटी’ने, या विधेयकावर बारकाईने विचार केल्यानंतर, २०११ साली, एफडीआय्ची मर्यादा वाढविण्याची गरज नसल्याचा सल्ला दिला होता. तेव्हा यशवंत सिंह हे या कमिटीचे अध्यक्ष होते.

आणि आता मोदी सरकार एफडीआय्ची कमाल मर्यादा ४९ टक्क्यांपर्यंत वाढविण्यासबंधीचे पहिले ठोस विधेयक संसदेत मांडणार आहे. यावरून आंतरराष्ट्रीय वित्तीय भांडवलाची खुशामत करण्यासाठी हे सरकार अति-उत्साही असल्याचे आणि नवउदारवादी धोरणे पुढे चालू ठेवण्याशी पूर्णत: बांधिल असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत. एफडीआय्चे हे विधेयक काँग्रेस पक्षाला मुळातच हवे होते. त्यामुळे काँग्रेस पक्ष संसदेत त्याला पाठिंबा देण्यास घुटमळणार नाही. दोन जुळ्या भावंडाचे हे एक उत्तम उदाहरण होय असेच म्हणायला हवे.

विमा क्षेत्रात अधिक एफडीआय्च्या समर्थनार्थ, आधीची जुनी कारणेच पुन्हा पुढे केली जात आहेत; जसे विमा क्षेत्रात अधिक भांडवल उपलब्ध झाले की विमा क्षेत्र विकसित होईल, विमा पॉलिसीद्वारे मिळणाऱ्या संरक्षणाचा लाभ अधिक लोक घेतील आणि अधिक रोजगार निर्माण होतील इत्यादी. हे सर्व मुद्दे सहजपणे नक्कीच खोडून काढता येतील. एकतर विमा क्षेत्राच्या विकासासाठी आपल्या देशात भांडवलाची मुळीच कमतरता नाही. दुसरे असे की जास्तीत जास्त नफा लाटण्यासाठी लबाड युक्त्या योजणाऱ्या, परकीय विमा कंपन्यांचे, वित्तीय स्थैर्य आणि त्या कंपन्या पुरवित असलेले वास्तविक संरक्षण पाहिले तर या कंपन्यांचा पूर्वेइतिहास अजिबात विश्वासार्ह नाही. हे आता कळून चुकले आहे.

अमेरिकेचे वित्तीय क्षेत्र असुरक्षित आणि दुर्बल असल्याचे आणि तेथील विमा कंपन्यांनी लोकांना साफ ठकविल्याचे, २००८ सालच्या जागतिक वित्तीय अरिष्टाने पूर्णपणे उघडकीस आणले होते. ‘अमेरिकन इन्श्युरन्स ग्रुप ही बलाढ्य विमा कंपनी अक्षरश: कोसळण्याच्या मार्गावर होती. तेव्हा फार मोठी किंमत मोजून अमेरिकन सरकारला ही कंपनी वाचवावी लागली होती. सावध करणाऱ्या या अनुभवामधून काही शिकण्याऐवजी, अनियंत्रित वित्तीय व्यवस्थेची दुर्बलता, असुरक्षितता आणि अस्थिरता, मोदी सरकार भारतीय विमा क्षेत्रात आणि पर्यायाने वित्तीय क्षेत्रात आणीत आहे.

भारतीय खाजगी विमा कंपन्यांमध्ये दिवाळखोरीची आणि फसवेगिरीची अनेक प्रकरणे झाल्याचे उघडकीस आल्यानंतर १९५६ साली भारतीय विमा क्षेत्राचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले होते. आज आपण पुन्हा त्या काळोख्या खाजगीकरणाच्या दिवसाकडे वळत आहोत. अमाप नफा मिळविण्याच्या हेतूने विदेशी कंपन्या, मोठ्या जोखीमयुक्त साहसी योजनांमध्ये गुंतवणूक करण्यासाठी, भारतीय विमा क्षेत्रात घुसल्या तर जनतेच्या बचती आणि त्यांचे हितसंबंध नक्कीच धोक्यात येतील. सध्या ७४% भारतीयांनी खाजगी कंपन्यांशी स्पर्धा करीत असलेल्या ‘एलआयसी’चीच पॉलिसी घेतली आहे. आपल्या नफ्याचा मोठा हिस्सा एलआयसी (जीवन विमा निगम) सरकारकडे सुपूर्द करते. आणि सरकारी विकासकार्यामध्ये आपल्या मोठ्या निधीची गुंतवणूक करते. सरकारच्या स्वाधीन असलेल्या विमा आणि पेन्शन फंडाचा वापर विकासकार्यासाठी आणि जनतेच्या कल्याणकारी योजनांसाठी करण्याऐवजी, मोठ्या वित्तीय कंपन्यांच्या आणि कार्पोरेट्च्या नफ्यासाठी आणि त्यांना आणखी सधन करण्यासाठी सरकारला विमा आणि पेन्शन फंडाचे खाजगीकरण करायचे आहे.

विमा क्षेत्रामध्ये एफडीआय्ची कमाल मर्यादा वाढविली की आपसूक, पेन्शन फंडात ‘एफडीआय्’ वाढेल कारण ‘पेन्शन फंड रेग्युलेटरी डिव्हलममेंट या कायद्यांतर्गत पेन्शन क्षेत्रातील एफडीआय्च्या मर्यादेशी सांगड विमा क्षेत्रातील एफडीआय्च्या मर्यादेशी घालण्यात आली आहे.

या ठिकाणी एक गोष्ट लक्षात घ्यायला हवी ती ही की, अशी सांगड घालण्याअगोदर, बँकींग क्षेत्र खाजगी कंपन्यांसाठी खुले करण्यात आले होते. याचा अर्थ बँकांचे राष्ट्रीयीकरण झाल्यापासून पहिल्यांदा, औद्योगिक घराण्यांना खाजगी बँका सुरू करण्याचा अधिकार देण्यात आला.

बँकींग क्षेत्रात एफडीआय्चे प्रमाण २६ टक्के आहे. परंतु गेल्या वर्षी बँकींग कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. बँकांच्या कार्यकारी मंडळात,

*(पान ७ पहा)*

# नियोजन आयोग बरखास्त करता येईल?

सुलभा ब्रह्मे

मे महिन्यात भारताचे पंतप्रधान बनलेले नरेंद्र मोदी यांनी १५ ऑगस्ट २०१४ रोजी लाल किल्ल्यावरील भाषणात जाहीर करून टाकले की, भारताच्या समावेशी विकासाची धुरा सांभाळण्यासाठी स्थापन केलेला नियोजन आयोग बरखास्त करण्यात येणार आहे. जनतेचे जीवनमान उंचावणे, देशाची साधनसंपत्ती वापरून रोजगार मिळवून देणे आणि उत्पादन वाढवणे या नियोजनाच्या उद्दिष्टांचा निर्देश मोदी करतात. परंतु त्यांच्या मते नियोजन आयोग तत्कालीन गरजा पूर्ततेसाठी प्रस्थापित केला होता, आता तो कालबाह्य झाला आहे. नियोजनाची वरील पैकी कोणती उद्दिष्टे पूर्ण झाली आहेत म्हणून नियोजन आयोग कालबाह्य ठरवावा? २१ ऑगस्ट रोजी नागपूर येथील भाषणात मोदींनी, सव्वाशे कोटी भारतीय जनतेने गरिबी दूर करण्यासाठी त्यांना साथ द्यावी असे आवाहन केले. याचा अर्थ त्यांनाही जनतेचे जीवनमान उंचावण्याची गरज आजही आहे हे मान्य आहे. ते नियोजनाविना कसे साधणार? सध्या असाही दावा केला जातो आहे की, आम्ही कृतिशील आहोत. नियोजनाची, विश्लेषण-विचाराची चैन पुरे झाली. पण विचार हा कृतीचा पाया असेल तरच अर्थपूर्ण व समुचित कृती करणे शक्य आहे. तेव्हा नियोजनाला मूठमाती देऊन कसे चालणार?

## नियोजनाचा वारसा

१९५० साली भारतामध्ये मार्गदर्शक नियोजनाला प्रारंभ केला तेव्हापासून हिंदुत्ववाद्यांचा दावा होता की नियोजन ही पाश्चिमात्य संकल्पना गैरलागू आहे. त्यामध्ये फक्त ऐहिक विचार आहे, भारतासारख्या पौर्वात्य, आध्यात्मिक संस्कृतीचा वारसा असलेल्या समाजास ती अनुरूप नाही. हे मांडताना भारतीय समाजाचा नियोजन, नियंत्रण आणि जबाबदार शासन याबाबतचा प्राचीन वारसा व आदर्श याकडे दुर्लक्ष केले जाते.

सुमारे ४५०० वर्षांपूर्वीच्या सिंधु संस्कृतीतील नगरे योजनाबध्द होती. योजना म्हटली की नियंत्रणे आलीच आणि त्याची अंमलबजावणी करण्यासाठी जबाबदार शासन यंत्रणाही आली. सुमारे २४०० वर्षांपूर्वी चंद्रगुप्त मौर्याच्या साम्राज्यामध्येही जबाबदार राज्यशासन, शासकीय अखत्यारीखालील उद्योग-व्यापार, आणि नियंत्रण व्यवस्था असल्यामुळे एवढ्या मोठ्या साम्राज्याचा व्यवहार सुरळीतपणे चालू शकला. कौटिलीय अर्थशास्त्रात त्याबाबतचे सम्यक मार्गदर्शन आहे. तेव्हा संयोजन व नियंत्रण या बाबत सखोल विचार आणि त्याचा कार्यक्षम वापर याची प्रदीर्घ परंपरा भारतास आहे. भाराताप्रमाणे प्राचीन मेसापोतेमिया व बॅबिलोनिया (इराक) येथील योजनाबध्द सिंचन व्यवस्था व नियोजनबध्द शहरे, चीनची भिंत, रोमन साम्राज्यातील महामार्ग व शहरे हे सर्व नियोजनाद्वारेच उभे केले होते. आधुनिक काळातही इंग्लंड, जर्मनी, जपान आदी भांडवलशाही देशात मार्गदर्शक नियोजनास कळीचे स्थान होते. भारताने स्वीकारलेले नियोजन हेही भांडवली देशांप्रमाणेच मार्गदर्शक होते. कम्युनिस्ट देशांप्रमाणे सर्वसमावेशी नियोजन अजिबातच नव्हते. कोणत्याही देशाचे संघटन करण्यासाठी आणि समाज - अर्थव्यवहार सुव्यवस्थितपणे चालवण्यासाठी ऐहिक जीवनाचे नियमन-नियंत्रण करणे अगत्याचे आहे. मग तो समाज पौर्वात्य असो वा पाश्चिमात्य, आस्तिक असो वा नास्तिक, इहवादी असो वा आध्यात्मिक असो, 'सबके साथ सबका विकास' करण्यासाठी नियोजन पायाभूत आहे.

## भारतातील नियोजनाची पूर्वपीठिका

भारतामध्ये जोवर परकीय सत्ता होती तोवर नियोजन अस्तित्वात येणे शक्य नव्हते. कारण भारतीय जनतेच्या विकासासाठी अनुकूल धोरणे ही ब्रिटीश भांडवलदारांच्या हितसंबधांच्या आड येणारी होती. स्वातंत्र्यपूर्व काळात काँग्रेस पक्षाने जमीनधारणा सुधारणा, उद्योगाचे राष्ट्रीयीकरण वगैरे घोषणा केल्या होत्या. १९३८ साली काँग्रेसचे अध्यक्ष सुभाषचंद्र बोस यांनी जवाहरलाल नेहरू यांच्या अध्यक्षतेखाली राष्ट्रीय नियोजन समिती नेमून काँग्रेसने नियोजनाला मानमान्यता दिली होती. विविध क्षेत्रासाठी योजना आखण्यासाठी २९ उपसमित्या नेमण्यात आल्या. त्यांचे अहवाल १९४० साली सादर झाले. नियोजनाचे सर्वमान्य उद्दिष्ट म्हणजे देशातील जनतेचे राहणीमान उंचावणे, या दृष्टीने योजना आखण्यात आल्या होत्या.

## स्वातंत्र्यानंतर

१९४७ साली भारत स्वतंत्र झाला. तेव्हा देशात मूलभूत उद्योग व यंत्रोद्योगाचा पूर्ण अभाव होता. भारतीय भांडवलदारांना परकीयांचे वर्चस्व कमी करून देशाची बाजारपेठ पटकावयाची होती. शेती व उद्योगांच्या विस्तारासाठी धातू, रसायने, यंत्रसामुग्री इत्यादी उद्योगांचा पाया देशात घातला जाणे तसेच वाहतूक, दळणवळण, वीजनिर्मिती, शिक्षण आदी सुविधा वाढवणे आवश्यक होते. वीज, रेल्वे, दूरसंचार सिंचन आदी सुविधांचे देशव्यापी जाळे उभारणे आणि सामान्य जनतेसही परवडेल अशा दरात या सेवा उपलब्ध करून देण्यासाठी प्रसंगी तोटा सोसणे ही जोखीम केवळ सार्वजनिक क्षेत्रालाच पत्करणे शक्य होते. मूलभूत व जड उद्योगांसाठी मोठ्या भांडवली गुंतवणुकीची गरज होती व प्रकल्प सुरू केल्यापासून प्रत्यक्ष नफा मिळेतो ८/१० वर्षे किंवा अधिक काळ लागतो, म्हणून ही जबाबदारीही सरकारनेच घ्यावी असे बड्या उद्योगपतींनी १९४४ साली बनवलेल्या 'बॉम्बे प्लॅन'मध्ये सुचवले होते. थोडक्यात, स्वातंत्र्यलढ्यातील स्वदेशाची प्रेरणा, भारतातील वजनदार औद्योगिक घराण्यांचे हितसंबध आणि नेहरूंसारख्या पुढाऱ्यांची आधुनिकीकरण व औद्योगिकरण याद्वारे विकास साधण्याची ईर्षा यामुळे भारताचा औद्योगिक पाया घालण्याची व जनोपयोगी सेवा - सुविधा पुरवण्याची जबाबदारी सार्वजनिक क्षेत्राने घेतली आणि जनतेकडून करांमार्फत उभ्या केलेल्या भांडवलाद्वारे योजनाबध्द पद्धतीने ती पार पाडली.

## नियोजनाचे योगदान

१९५० साली नियोजन आयोगाची स्थापना होऊन भारतामध्ये मार्गदर्शक नियोजनाला प्रारंभ झाला. भारतीय राज्यघटनेमध्ये खाजगी मालमत्तेचे संरक्षण मूलभूत हक्कात समाविष्ट आहे. तेव्हा योजनेखाली केलेली गुंतवणूक ही प्रामुख्याने खाजगी उद्योग, व्यापार, व शेती यांच्या वाढीला पूरक अशीच होती. १९५५ ते १९६५ या काळात दुसऱ्या व तिसऱ्या पंचवार्षिक योजनेखाली सार्वजनिक क्षेत्राचा मोठा विस्तार करण्यात

आला: **केंद्र सरकार -** रेल्वे, टपाल, दूरध्वनी, हवाई वाहतूक, महामार्ग, इत्यादी. **राज्य सरकार -** वीज, सिंचन, प्रवासी बस वाहतूक इत्यादी. पोलाद उद्योग, पेट्रोलियम, खाणी, यंत्रनिर्मिती इत्यादी. सरकारी मालकीचे सार्वजनिक क्षेत्रातले उद्योग नव्याने स्थापन करण्यात आले. १९५०-५१ मध्ये राष्ट्रीय उत्पादन - मूल्यात सार्वजनिक क्षेत्राचा वाटा ७.५ टक्के होता, तो १९८७-८८ मध्ये सुमारे २५ टक्के झाला. सार्वजनिक क्षेत्रातील, रिझर्व बँक, स्टेट बँक, आयुर्विमा, सर्वसामान्य विमा, व्यापारी बँका, विकास बँका, आदी संस्था सार्वजनिक क्षेत्राला, तसेच खाजगी उद्योगांसही मोठ्या प्रमाणात भांडवल पुरवतात. शेतीक्षेत्रास सार्वजनिक क्षेत्राकडून फार मोठी पायाभूत मदत झाली. सिचंन प्रकल्पामध्ये मोठी गुंतवणूक, विहिरी व कूपनलिकांसाठी स्वस्त दरात कर्जपुरवठा , विजेचा जवळजवळ विनामूल्य पुरवठा, शेती संशोधन, संकरित व सुधारित बियाणांचा विकास व प्रसार, रासायनिक खतांवर अनुदान इ. अनेक मार्गांनी शेती उत्पादनाच्या वाढीला सार्वजनिक क्षेत्राने मदत केली.

१९५०-६५ या तीन पंचवार्षिक योजनांच्या काळात सार्वजनिक क्षेत्राच्या मदतीने खाजगी क्षेत्राची वाढ चालू होती. सार्वजनिक क्षेत्राचा मोठा फायदा खाजगी उद्योग, राज्यकर्ते व नोकरशहांनी उपटला. शिक्षितांना नोकऱ्या, त्यामध्ये खाजगी उद्योगांच्या विस्तारावर मर्यादा आल्याने १९८०च्या दशकात येथील बडे उद्योगपती परकीय कंपन्यांचे भागीदार बनून आपले नफे टिकवण्याकडे वळले. १९८१ मध्ये नाणेनिधीचे मोठे कर्ज घेऊन बेबंद मोकाटीकरण दामटले जाऊ लागले.

## जागतिकीकरण पर्व

जुलै १९९१ मध्ये भारतातला भांडवलदार वर्ग व त्यांचे हितरक्षण करणारी केंद्र व राज्य सरकारे यांनी नियोजनाचे 'नेहरू मॉडेल' मोडीत काढून रीगन - थॅचर यांचे आर्थिक अनागोंदीचे मॉडेल उघडपणे स्वीकारले. ४० वर्षांच्या काळात सार्वजनिक क्षेत्रात अब्जावधी रुपयांची गुंतवणूक करून विकसित केलेले पेट्रोल, दूरसंचार, वित्तसंस्था, विमा हे भरपूर नफा देणारे सार्वजनिक उद्योग व सेवा यामध्ये खाजगीकरणाचे धोरण रेटून बड्या देशी-परदेशी कंपन्यांना ते बहाल करणे सुरू झाले. उदाहरणार्थ टाटांना 'विदेश संचार निगम' तर रिलायन्सला 'पेट्रोलियम उद्योग'. आयकर, कंपनीकर, आयात शुल्क, आदी करांमध्ये मोठी कपात केली. नियंत्रणे दूर करून नफ्याची नवी क्षेत्रे - जंगले, शेती, पाण्याचा व्यापार - बड्या कंपन्यांना खुली केली. नव्या आर्थिक धोरणाखाली बड्या कंपन्यांना शासन मोठमोठे जंगलपट्टे बहाल करीत असून मोठ्या संख्येने आदिवासींची निर्वाहसाधने हिरावून घेतली जात आहेत. नवी बंदरे, विमानतळ, पर्यटन केंद्रे, महामार्ग, कारखाने यासाठी शेतकऱ्यांच्या जमिनी ताब्यात घेऊन शासन शेतकऱ्यांना देशोधडीला लावत आहे. विस्थापितांचे हे तांडे धरणे, महामार्ग, बंदरे, आलीशान इमारती, उड्डाणपूल, अशा महाकाय बांधकाम प्रकल्पांकडे फेकले जात आहेत. ठेकेदारांच्या चाबकाखाली भरडले जात आहेत. भारतातील या भणंग भांडवलशाही अवस्थेमध्ये धर्मांधता, जातजमातवाद, इलेक्ट्रॉनिक मीडियाचे मोहजाळ, पैशाची धुंदी, शासकीय दमणयंत्रणा व गुंडसेना फोफावत आहे.

१९९१ सालापासून भारत सरकारने असे परकीय भांडवलाच्या कुबड्या घेऊन श्रमिक जनतेला देशोधडीला लावण्याचे धोरण लादल्याने विषमता वाढत आहे. सामाजिक अधोगती चालू आहे. प्रगत राज्ये परकीय भांडवल आकर्षून घेत आहेत आणि मागास राज्ये मागे पडत आहेत. मोदी घोषणा करतात त्याप्रमाणे सर्व राज्यांची प्रगती साधायची असेल आणि गरिबी दूर करायची असेल तर नियोजनाविना गत्यंतर नाही. त्यासाठी अनुभवी, तज्ज्ञ यंत्रणा योजना आयोगाच्या स्वरूपात अस्तित्वात आहे.

## आजचा नियोजन आयोग

नियोजन आयोगांच्या सदस्यांनी राजीनामे दिलेले आहेत. बाकी नियोजन आयोगातील ५०० अधिकारी, कर्मचारी आपापल्या जबाबदाऱ्या सांभाळत आहेत. मग तो आंध्र प्रदेश-तेलंगण विभाजनाचा गुंतागुंतीचा प्रश्न असो, पंतप्रधानांची 'स्वच्छ भारत मोहीम' असो, विविध मंत्रालयांच्या खर्चाच्या प्रस्तावाची छाननी व मंजुरीचा प्रश्न असो, योजनेअंतर्गत राज्यांना उपलब्ध करून द्यावयाचा निधी व विविध योजना असोत. विविध मंत्रालयांना गरज असलेली माहिती पुरवणे, विविध योजना आखणे, त्यांचे मूल्यमापन करणे ही सारी जबाबदारी नियोजन आयोगातील विविध विशेषज्ञ, विभागीय संचालक आदी तज्ज्ञ व अनुभवी अधिकारी तेथील सेवकांच्या मदतीने पार पाडत आहेत. नियोजन आयोग बरखास्त केल्यास वर उल्लेखलेली परीक्षणाची, समन्वयाची, भांडवली गुंतवणूकीच्या नियोजनाची व मूल्यमापनाची जबाबदारी कोण घेणार ? आहे ती यंत्रणा मोडून त्याजागी नवी व्यवस्था उभी करण्याच्या मागे लागण्याचे प्रयोजनच काय ? चालू व्यवस्थेतील त्रुटी सुधाराव्या. पण डोके दुखते म्हणून त्यावर इलाज करण्याऐवजी डोके उडवायचे ठरवले तर...

खरे म्हणजे, समस्या नियोजन आयोग ही नसून सारी गफलत आहे ती केंद्र शासनाच्या धोरणामध्ये. आज नियोजन आयोगाला केवळ तांत्रिक स्थान उरले आहे. नियोजन आयोगाची मुख्य जबाबदारी आहे. सर्व जनतेला चांगले जीवन, रोजगार उपलब्ध करून ताठ मानेने जगता येईल यासाठी समुचित योजना आखणे. अर्थात या योजना अंमलात आणण्याची जबाबदारी भारत सरकारने मान्य केली पाहिजे. त्यासाठी भारतीय शासनाचे सध्याचे जागतिकीकरण, खाजगीकरणाचे धोरण बदलावयास लावणे आणि नियोजन, नियंत्रणाद्वारा लोककेंद्री विकास धोरण शासनास स्वीकारावयास लावणे गरजेचे आहे. हे साधण्याकरीता देशातील खाजगीकरण - जागतिकिकरणविरोधी लोकचळवळींमध्ये समन्वय साधून, त्यांची व्याप्ती वाढवत, त्याला देशव्यापी स्वरूप देणे आवश्यक आहे. ☐☐☐

## (विमा क्षेत्रात 'एफडीआय्'... पान ५ वरून)

परकीय गुंतवणूकदारांसाठी मतदानाची मर्यादा वाढवून आधीच्या १० टक्क्यावरून २६ टक्के करण्यात आली आहे. परिणामी विदेशी बँकांना, भारतीय खाजगी बँकांवर आपला ताबा ठेवणे शक्य होईल, राष्ट्रीयीकृत बँकांच्या समभागांची मोठ्या प्रमाणात निर्गुंतवणूक होईल असे आश्वासन अर्थसंकल्पात देण्यात आले आहे.

विदेशी गुंतवणुकीसाठी विमा क्षेत्र खुले करणे, हा संपूर्ण वित्तीय क्षेत्राच्या उदारीकरण प्रक्रियेचा एक भाग आहे. त्यामुळे वित्तीय क्षेत्र-उदारीकरणाच्या विरोधातील लढा हा वस्तुत: नवउदारीकरण व्यवस्थेच्या विरोधातील लढ्याचे एक विशेष अंग आहे. ही नवउदारवादी धोरणे जनहितविरोधी आहेत; आणि राष्ट्रीय सार्वभौमत्वाच्या विरोधात जाणारी आहेत.

हा लढा केवळ विमा कामगारांचा/कर्मचाऱ्यांचा लढा नव्हे. संपूर्ण कामगार संघटना चळवळीने आणि डाव्या व लोकशाहीवादी शक्तींनी या लढ्याचे नेतृत्व करायला हवे. संसदेत आणि संसदेबाहेर, रस्त्यावर उतरून, विमा कायद्यातील होऊ घातलेल्या दुरुस्ती विधेयकाच्या विरोधात एक जबरदस्त आंदोलन उभे करायला हवे. **(अनुवाद : शोभा ठेकेदत)**

# निमित्त : सर्वजातीय विठ्ठल

**सुभाष थोरात**

कुठल्याही गोष्टीची क्रांतीकारकता अथवा प्रगतीशीलता आपल्याला सापेक्ष पद्धतीने पहावी लागते. उदा. सरंजामशाहीच्या तुलनेत भांडवलदारी व्यवस्था ही प्रगती कारक असते. कारण त्यामुळे समाजाने प्रगतीच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकलेले असते. याचप्रमाणे सुप्रिम कोर्टाने विठ्ठल मंदिर पुजेचा बडव्यांचा आजवरचा पारंपारीक अधिकार (ज्याला कुठल्याही धर्मशास्त्रात मान्यता नाही) निकालात काढल्यामुळे जातीव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर सापेक्षपणे पाहीले तर हे एक प्रगतीचे पाऊल समजले पाहिजे.

महाराष्ट्रात बहुजनांचे दैवत म्हणून विठ्ठलाचे स्थान केवळ अनन्य साधारण आहे. महाराष्ट्रीय संस्कृतीत विठ्ठल भक्ती इतकी व्यापक, सार्वत्रिक, सर्वजातीय खोलवर रूजलेली भक्ती दुसऱ्या कोणा दैवताची नाही. ही भक्ती रुजवण्यात वारकरी पंथाच्या संतांचा अर्थातच खुप मोठा वाटा आहे. वारकरी पंथाच्या संतांच्या अभंगांची, त्यातही संत तुकारामांच्या अभंगांनी ही विठ्ठल भक्ती अगदी घरोघरी पोहोचवली. मराठी भाषेला - संस्कृतीला समृध्द आणि प्रागतीक करण्यात या वारकरी संत परंपरेचे खास असे योगदान आहे. विठ्ठल भक्तीत 'समतेची पताका' फडकवण्याचे काम या विठ्ठल भक्तीय संतानी केले आहे. 'माझे माहेर पंढरी'अशी भावना वारकरी पंथातील सर्वजातीय संतात दिसून येते. तो त्यांच्यासाठीच नव्हे तर अवघ्या जनतेसाठी 'विठु माऊली' आहे. 'विठू माझा लेकुरवाळा, संगे संताचा मेळा' या काव्यात विठ्ठलाचे हे सर्व जातीच्या संतांना बरोबर घेऊन जाणारे रूप दिसुन येते. यामुळेच प्रसिध्द संशोधक रा. चिं. ढेरे यांनी 'श्री विठ्ठल एक महासमन्वय' हे शिर्षक देऊन विठ्ठलाच्या एकंदर स्वरूपाची अनेक अंगेउपांगे उलगडून दाखवणारा महाग्रंथ लिहिला आहे.

जातीव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर 'महासमन्वय' हा रा. चिं. ढेरे यांनी वापरलेला शब्द अन्वयार्थक आहे. संत नामदेवाचे कपडे शिवणारा, चोखोबाची गुरे राखणारा, संत जनाबाईसाठी दळण दळणारा ही विठ्ठलाची रूपे एका अर्थाने सामाजिक समतेचा संदेश देणारीच आहेत. त्याच्यासाठी हे विविध जातीय संत असमान नाहीत तर तो सर्वांशी एकरूप आहे. पण या गोष्टीकडे आपण जेव्हा व्यापक अर्थाने पाहतो तेव्हा हा असा जातीय समन्वय का घडून येतो, त्याची सामाजिक-आर्थिक-सांस्कृतीक कारणे काय आहेत? या प्रश्नाकडे आपल्याला लक्ष द्यावे लागते.

हा विषय केवळ संत आणि विठ्ठल यांच्या व्यक्तिगता संबंधाचा राहत नाही. तर एका विशिष्ट सामाजिक परिस्थितीचे प्रतिक्रिया स्वरूप म्हणून आपल्यापुढे येतो आणि याचे उत्तर आपल्याला त्यावेळच्या एकंदर सामाजिक परिस्थितीत शोधता येते. सुप्रसिध्द मार्क्सवादी विचारवंत डि. डि. कोसंबी यांनी गीतेतील सर्व विचार समन्वयाचे मूळ शोधताना असा निष्कर्ष काढला आहे की, ज्या काळात वर्गीय अंर्तविरोध तिव्र नसतात. म्हणजे वर्ग संघर्ष तीव्र नसतो तेव्हा वर्ग समन्वयाची भूमिका अस्तित्वात येते. सर्वच विचारांना म्हणजे दैववादी आणि भौतिकवादी अशा दोन्ही विचारसरणींना गीतेत सारखेच स्थान मिळाले आहे. याचे कारण त्या काळातील तीव्र नसलेल्या वर्गीय परिस्थितीत आहे. हा वर्ग समन्वय आणखी एका कारणांमुळे घडतो, तो म्हणजे स्व-संस्कृतीवर येणारे आक्रमण आणि तीच्या अस्तीत्वाचा प्रश्न निर्माण होणे. त्यावेळी आपापसातील मतभेद विसरून एक होऊन परकीय आक्रमणाशी - संस्कृतीशी झगडा करण्याच्या परिस्थितीत अस्तित्व शोधता येते.

मुस्लिम राजवटीत जेव्हा जातीव्यवस्थेत अन्याय भोगणारा वर्ग-धर्मांतराकडे वळू लागला. तेव्हा आपल्याला विठ्ठलाचे हे सर्व जाती समन्वयाचे रूप अविष्कारीत होताना दिसते. सर्व जातींना एका भक्तीसुत्रात बांधून ठेवणारे रूप आणि प्रत्येक जातीतून उदयाला आलेले संत म्हणजे त्या त्या जातीचे प्रतिनिधी अशा स्वरूपाची एक सांस्कृतीक रचना पुढे येते. शिव छत्रपतींची स्वराज्याची कल्पना आणि सर्व जातींना समानतेने बांधून घेण्याची संकल्पना याच सांस्कृतिक रचनेच्या अविष्कारातून उदय पावते.

यासाठी आपण भारतीय स्वातंत्र्य लढ्याचे उदाहरण घेऊ. ब्रिटिशांविरुद्ध सर्व जनता एकवटून उभी राहते. मग बाबू गेनूसारखा कामगार ब्रिटिशांच्या ट्रकखाली स्वत:ला झोकून घेतो. जरी येणाऱ्या स्वातंत्र्यात तो ज्या कामगार वर्गातून आलेला असतो त्याला काहीच स्थान नसते. त्याचे शोषण तर चालूच राहणार असते. पण राष्ट्रवादाच्या भावनेतून तो भांडवलदारवर्गाचे नेतृत्व असलेल्या स्वातंत्र्यलढ्यात जीवाचे रान करतो. ही राष्ट्रवादाची भावना वर्गसमन्वय घडवून आणते. हे आपण राष्ट्रा-राष्ट्रातील युद्धात पाहू शकतो. यात हानी होते ती कामगारवर्गाची, शोषितवर्गाची आणि फायदा नेहमी सत्ताधारी जात-वर्गाला होतो. शिवछत्रपतींचे स्वराज्य आले ते मावळ्यांच्या म्हणजे या शेतकरी-मराठा जातीच्या आणि महार-मांग-रामोशी यांच्या शौर्यावर पण पुढे त्याचा फायदा देशमुख–जमीनदारांनी-संस्थानिकांनीच उठवला. पुढे जाती-अत्याचारांना अधिक विकृत स्वरूप देणाऱ्या पेशव्यांचे राज्य या प्रक्रियेतूनच पुढे आले. शेतकरी, आणि दलित उपेक्षित राहिले अगदी आजही उपेक्षितच आहेत, पण लढले तेच.

तर आपण बोलत होतो वर्ग समन्वयाच्या परिस्थितीबद्दल. सर्व जातींतून उदयाला आलेले संत आणि त्यांचे श्रद्धास्थान असलेला विठ्ठल या परिस्थितीची उपज आहे. असे असले तरी या मध्ययुगीन काळातील संतांचे कार्य हे काळाच्या पुढे जाणारे होते. जसे शिवछत्रपतींचे वर्तन त्या काळातील सरंजामी मूल्यांविरोधी जाणारे; म्हणजे काळाच्या पुढे जाणारे होते. संत नामदेवांचे उदाहरण घेऊ. त्याकाळी त्यांनी संत जनाबाईंना आपल्या घरी कामावर ठेवले. संत नामदेव शिंपी जातीत जन्मल्यामुळे त्यांच्या घरी कोणी त्यांच्यापेक्षा वरच्या अथवा त्यांच्या बरोबरच्या जातीची मानली गेलेली कुठलीही व्यक्ती 'दासी' म्हणून काम करणे शक्य नव्हते. तेव्हा एका दलित जातीय जनाबाईंना घरी कामावर ठेवणे हे एक क्रांतीकार्यच होते. शिवाय त्यांनी चोखोबा गावकुसाची भिंत बांधताना मरण पावले, तेथे जाऊन त्यांच्या अस्थी गोळा करून त्यांची समाधी उभारली. हेही कार्य कमी क्रांतिकारक नाही. पण संत नामदेवांचे कार्य खरं तर उपेक्षितच राहिले.

आता 'घुमान'मध्ये अखिल भारतीय साहित्य संमेलन भरवताना संयोजकांना त्यांची आठवण आली आहे. पण त्यांनी पंजाबात मराठी संस्कृती कशी नेली यापुरतेच त्यांचे कौतुक मर्यादित आहे. त्यांच्या जीवनातील या

क्रांतिकार्याबद्दल कधीच बोलले जात नाही. किंबहुना सर्वच संतांच्या बाबतीत आपल्याला तसे म्हणता येईल त्यांच्या मुख्य कार्याकडे दुर्लक्ष करून सोयीप्रमाणे त्यांना वापरून घेणाऱ्या हितसंबंधियांची संख्याच जास्त आहे. उदा. ज्ञानेश्वरांनी' ईश्वरकल्पित-शास्त्रे-शाब्दिक-पुराणे बाष्कळीत' अशी एका वाक्यात जहाल म्हणता येईल अशी धर्मचिकित्सा करून ठेवली आहे. म्हणजे ईश्वर ही संकल्पना केवळ कल्पिलेली आहे. धर्मशास्त्रे केवळ शाब्दिक आहेत. त्यात व्यवहार आणि अनुभव नाही. तर पुराणे केवळ बाष्कळ आहेत. पण यावर चर्चा होत नाही. पण त्यांनी भिंत कशी चालवली, रेड्यामुखी वेद कसे वदवले याचीच चर्चा होताना दिसते. आज तर सर्व हिंदुत्ववाद्यांनी संत चळवळ वेठीस धरलेली दिसून येते. वारकरी पंथाच्या कुठल्याही संतांच्या शब्दात आणि व्यवहारात अंधश्रद्धेला स्थान नाही. पण त्यांचा वारसा सांगणाऱ्या वारकऱ्यांना पुढे करून अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कायद्याचे मारेकरी त्यांना बनवण्यात आले होते.

आपल्या देशातच नव्हे तर सर्वच देशात मध्ययुगात धर्मपिठे ही सत्तेची आणि संपत्तीची केंद्रे होती आणि त्या त्या वेळच्या पुरोहित वर्गाने आपापल्या ताब्यात ठेवली होती. आपल्याकडे सर्व मंदिरे अगदी बोधगयेचे मंदिरही ब्राह्मण पुरोहितांनीच ताब्यात ठेवले होते. पूजेचा अधिकार म्हणजे संपत्ती लाटण्याचा अधिकार त्यांना होता. विठ्ठल हा ब्राह्मणी परंपरेतील देव नाही. त्याची सर्व रूपे पाहिली, त्याच्याबद्दलच्या सर्व कथा पाहिल्या तर चोखोबा असो अथवा जनाबाई सर्वांच्या ठायी तो समान आहे. त्याअर्थाने तो समतेचा वाहक आहे. जरी कर्ममेळ्याने म्हटल्याप्रमाणे 'इतका सर्वशक्तीमान असूनही त्याला जातीव्यवस्था नष्ट करता येत नाही. मग ही सर्वशक्तीमानता काय उपयोगाची.' असे असले तरी जातीव्यवस्थेच्या पार्श्वभूमीवर तो समतामूल्यांचा वाहक आहे. शिवाय तोच एक असा देव आहे की जो कंबरेवर हात ठेवून विटेवर उभा आहे. इतर देवदेवतांप्रमाणे तो हिंसक नाही. त्याच्या हातात शस्त्र तर नाहीच उलट त्याचे हात कमरेवर आहेत. हे वर म्हटल्याप्रमाणे त्याच्या काळी वर्गविरोध तीव्र नसल्याचे लक्षण आहे. बाकीचे देव कोणाला ना कोणाला मारण्याच्या तयारीत आहेत किंवा कोणाला तरी मारून 'जित गया' म्हणत आहेत.याला आर्य-अनार्य यांच्यातील संघर्षाचे परिणाम आहे. शिवाय विठ्ठल बुद्धासारखा अहिंसक आहे. त्याच्या नावावर एक पण 'हत्या' नमूद नाही. किंवा तो हत्येची शिकवण देत नाही.

अशा समताप्रिय, अहिंसक विठ्ठलाची पूजा करताना वेदातील पुरुषसुक्त म्हटले जाते. हे विठ्ठलाच्या एकंदर स्वरूपाशी आणि वारकरी पंथाच्या एकंदर विचाराशी पूर्ण विरोधी आहे. पुरुषसुक्तात चार वर्णांच्या निर्मितीचा सिद्धांत मांडला आहे. जसे बायबलमध्ये सूर्य पृथ्वीभोवती फिरतो आणि पृथ्वी सपाट आहे. हे विज्ञानाने खोटे ठरविले आहे. तद्वतच ब्राह्मण मुखापासून, क्षत्रीय बाहुपासून, वैश्य मांड्यांपासून, शुद्र पायापासून हा ब्राह्मण्यवादी सिद्धांत आज वैज्ञानिकदृष्ट्या पूर्ण चुकीचा आणि ब्राह्मण जातीचे हितसंबंध कायम ठेवणारा आहे. सर्व मंदिरांतील पूजेचा अधिकार याच सिद्धांताद्वारे ब्राह्मणांनी स्वत:कडे घेतला आहे. ते इतरांपेक्षा पवित्र, वरचे इतकेच नव्हे तर ते 'भूदेव' आहेत. अशी समजूत भोळसट, धार्मिक जनतेची करून देण्यात आली आहे. आजही या समजुतीतून बहुजन पूर्ण बाहेर पडलेले नाहीत. त्यामुळे ही 'पुरुषसुक्तीय' पूजा बंद करण्याची आंदोलकांची मागणी अगदी योग्य आहे. आज बडवे पुजारी नसले तरी पूजा जर जुन्याच पद्धतीने आणि जातीरचनेच्या समर्थनार्थ होत असेल तर याला विरोध केला पाहिजे. वेदोक्त की पुरोणोक्त हा वाद शाहू आणि तत्कालीन ब्राह्मण-सनातनी यांच्यात होऊन गेला आहे. शाहूंचा वारसा सांगणारे आज सत्तेवर आहेत. त्यांनी तरी याची चाड बाळगली पाहिजे.

दुसरी गोष्ट मात्र समतेच्या विचारांशी जोडलेली आहे आणि ती अधिक लाज आणणारी आहे. आज पंढरपूर एक मोठे पवित्र असे तीर्थस्थळ बनले आहे. तेथे येणाऱ्या लाखो-करोडो लोकांकडून तेवढेच पैसे तेथे जमा होतात. असे असूनही पंढरपूर एक बकाल शहर आहे. शिवाय या लाखो लोकांच्या मलमूत्र विसर्जनाची आज पुरेशी सोय नाही. आता आतापर्यंत आणि आजही सफाई कामगारांना विष्ठा डोक्यावर वाहून न्यावी लागते. विठ्ठलनामाचा गजर करून पुण्य कमावून घरी जाणाऱ्या विठ्ठल भक्तांना याची जाणीव नाही. कणव नाही. कारण त्यांच्याही डोक्यात संताच्या अभंगातील आशयापेक्षा आपली 'जात' भक्कमपणे रुजली आहे. 'भक्तीत एक आणि पंक्तीत भेद' चालूच आहे. त्यामुळे या सफाई कामगारांना विठ्ठलाच्या अपरंपार भक्तीचा जो त्रास सहन करावा लागतो, त्याकडे कोणाचे लक्ष नाही. विठ्ठलाची पूजा बडव्यांनी करावी की सर्वजातीयांनी करावी या पेक्षा हे मानवतेच्या दृष्टीने अधिक महत्त्वाचे आहे. पण त्याकडे सरकारचे लक्ष नाही. भक्तांचे नाही आणि कुठल्या क्रांतिकारकांचे ही नाही. 'मुकी बिचारी कोणीही हाका' अशीच परिस्थिती या पंढरीत या सफाई कामगारांची आहे 'माझे माहेर पंढरी' असे गळे काढून म्हणणाऱ्या विठ्ठल भक्तांनी याकडे लक्ष दिले तर 'तुकोबांनी म्हटल्याप्रमाणे 'जे का रंजले गांजले त्यासी म्हणे जो आपुले - तोचि साधू ओळखावा देव तेथेची जाणावा' हे प्रत्यक्ष जीवनात साकार केल्यासारखे होईल. ब्राह्मण पुजारी जाऊन सर्वजातीय पुजारी आले ही छानच गोष्ट आहे. आता पूजा ही समतेच्या तत्वानुसार व्हावी आणि विठ्ठल भक्तीचा त्रास सफाई कामगारांना न होता त्यासाठी आधुनिक काही सोयीसुविधा भक्तांच्याच देणगीतून उभ्या राहिल्या तर 'माझे माहेर पंढरी' हे अभिमानाने म्हणता येईल.

अशा प्रसंगी आपल्याला थोर साने गुरुजींची आठवण काढावीच लागेल. दलितांना विठ्ठल मंदिरात प्रवेश मिळावा म्हणून त्यांनी आमरण उपोषण केले होते. चोखोबाच्या गळ्यात स्वत:च्या मोत्याचा कंठा घालणाऱ्या आणि त्याची गुरे राखणाऱ्या विठ्ठलाच्या मंदिरात दलितांना प्रवेश मिळावा म्हणून उपोषण करावे लागणे हा तर विठ्ठलाचाच मोठा अपमान समजला पाहिजे. शेवटी 'धाव घाली विठ्ठला चालू नको मंद-बडवे मज मारीती काय अपराध' चोखोबांना मारणाऱ्या आणि आजवर विठ्ठल भक्तांना नाडणाऱ्या अपमानास्पद वागणूक देणाऱ्या 'बडव्यांचे' निर्दालन झाले ही चांगलीच गोष्ट आहे.

□□□


## मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या मुखपत्रांची वार्षिक वर्गणी

**जीवनमार्ग - रु. ३००, लोकलहर - रु. २००, पीपल्स डेमॉक्रसी - रु. २५०, मार्क्सिस्ट - रु. १००**


*आपल्या संपूर्ण पत्त्यासहित मनी ऑर्डर/बँक ड्राफ्टने वर्गणी पाठविण्याचे पत्ते*

व्यवस्थापक, जीवनमार्ग, जनशक्ती, पांडुरंग बुधकर मार्ग, वरळी, मुंबई - ४०००१३

इतर मुखपत्रे : मॅनेजर, लोकलहर, १५ तालकटोरा मार्ग, नवी दिल्ली - ११०००१

# आधुनिक भारताच्या इतिहासकाराचं जाणं

ॲड. संजय पांडे



'पाठ्यपुस्तक लेखन हे अधिक कठीण काम. अतिशय कठीण वेळखाऊ आणि जबाबदारीचं. याकरिता आपल्यात विषयाला प्रमाणित आणि मनोरंजक बनवण्याची उच्च पातळीची क्षमता असावी लागते. येथेच अभ्यासक्रमातल्या पुस्तकांशी निगडीत वादविवाद झाला पाहिजे. मी तेथे का ? याची मला जाणीव असायला हवी. १९६० व १९७०च्या दशकातल्या एनसीईआरटीच्या पाठ्यपुस्तकांचे लेखन त्यावेळच्या पुस्तकामधल्या अज्ञान आणि सांप्रदायिक पूर्वग्रहांना दूर करण्यासाठी करण्यात आलं, डाव्या किंवा राष्ट्रवादी पूर्वग्रहांची ओळख करून देण्यासाठी नव्हे' - बिपीन चंद्रा (हिंदुस्थान टाइम्स, २ डिसेंबर २००१)

प्रा. बिपीनचंद्र एक असे इतिहासकार होते ज्यांनी आपल्या सर्जनशील आणि विश्वसनीय लेखनातून स्वतंत्र भारताचा वारसा व भारताच्या स्वातंत्र्य चळवळीतील विविध पैलूंबाबत आमची समज समृद्ध केली. दिल्लीत हिंदू कॉलेज येथे प्राध्यापक व पुढे जवाहरलाल नेहरू युनिर्व्हसिटीत व्याख्याता आणि ते विद्यापीठ सुरू झाल्यापासून प्राध्यापक म्हणून त्यांनी तेथे काम केले. त्यांनी 'इन्क्वायरी' (चौकशी) नावाचे नामांकित मासिक सुरू केले आणि त्याच्या संपादक मंडळात अनेक वर्षे त्यांनी काम केले. १९८५ मध्ये भारतीय इतिहास काँग्रेसचे ते अध्यक्ष राहिले. जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या इतिहास विभागाचे अध्यक्ष आणि विद्यापीठ अनुदान आयोगाचे सदस्य म्हणून त्यांनी १९९३ साली आपलं योगदान दिलं. नॅशनल बुक ट्रस्टचे २००४ ते २०१२ दरम्यान ते अध्यक्ष राहिले. त्यांची 'इंडिया आफ्टर इंडिपेंडंस' आणि 'इंडियाज् स्ट्रगल फॉर इंडिपेंडंस', ही आधुनिक भारताच्या इतिहासावरील सर्वात प्रामाणिक आणि स्पर्धा परिक्षांसाठी अत्यंत मोलाची अशी पुस्तके मानली जातात. भारताची स्वातंत्र्य चळवळ, जातियवादी राजकारण, लोकशाही व्यवस्थेचे प्रश्न, जयप्रकाश आंदोलन, आणीबाणी, वसाहतवाद, विचारधारात्मक प्रवाह, राष्ट्रवाद, आर्थिक राष्ट्रवाद, कार्ल मार्क्स ते गांधी यांसारख्या विषयांवर त्यांची जवळपास १७ प्रमुख पुस्तके प्रकाशित झाली व त्यांनी वाचकांची पसंती व लोकप्रियता मिळविली. 'राइज ॲण्ड ग्रोथ ऑफ इकॉनॉमिक नॅशनॅलिझम इन इंडिया'(भारतात आर्थिक राष्ट्रवादाचा उदय व विकास) या लिखाणात त्यांनी वसाहतवादाच्या कामकाजावर टीका, भारतात आर्थिक राष्ट्रवादाचा उभार आणि गतीशिलतेवर त्यांनी लिखाण केले.

केंद्रात वाजपेयी सरकार आल्याबरोबर दोन दशकाहून अधिक काळापासून शिकवल्या जाणाऱ्या अभ्यासक्रमामुळे अचानक भावना दुखावल्या जात असल्याचा साक्षात्कार झाला. भाजप सरकारच्या कार्यकाळात एनसीईआरटी पुस्तकांच्या पुनर्लेखनाचे काम वेगाने हातात घेण्यात आले. प्रो. रोमिला थापर, आर. एस. शर्मा, बिपीन चंद्र, डी. एन. झा, सतीशचंद्र, अर्जुन देव, इरफान हबीब, के. एम. श्रीमली या जगप्रसिद्ध इतिहासकारांनी लिहिलेल्या पुस्तकांचे अंश जातियवादी हल्ल्यांचे लक्ष्य बनले. या इतिहासकारांवर, त्यांच्या पाठ्यपुस्तकांतील काही परिच्छेद, काही धार्मिक व जातीसमूहांच्या भावनांच्या विरोधात जात असल्याचे आरोप करण्यात आले. प्रा. रोमिला थापर, आर.एस. शर्मा आणि डी. एन. झा या इतिहासकारांनी पुरातत्विक साक्षांच्या आधारावर हे सिद्ध केले की, वैदिक काळात आर्य गोमांस खायचे. सतिश चंद्र यांच्या लेखनात गुरूतेज बहादूर सिंह यांच्याद्वारे लुट आणि दरोड्याची मदत घेण्याचा उल्लेख करण्यात आला होता. याचा विरोध सुरू झाला.

भारताच्या पुरोगामी मानल्या जाणाऱ्या या इतिहासकारांच्या लिखाणाचा संघ परिवाराने नेहमीच वैचारिक आधारावर विरोध आणि त्यावर हल्ला केला. त्यावेळचे मनुष्यबळ विकासमंत्री मुरली मनोहर जोशी यांनी या इतिहासकारांना कम्युनिस्ट व मार्क्सवादी इतिहासकार घोषित केले. या वैज्ञानिक आणि लोकशाहीवादी, खुले धर्मनिरपेक्ष आणि पुरोगामी इतिहासकारांच्या पुस्तकांना त्यांनी 'भारताच्या सांस्कृतिक स्वातंत्र्याशी लढा' (हिंदुस्थान टाइम्स, ८ डिसेंबर २००१) म्हणत याला 'डाव्यांचा बौद्धिक दहशतवाद' ठरवत याला 'वैचारिक दहशतवाद जो सीमेपार दहशतवादापेक्षा अधिक धोकादायक आहे' असे जाहीर केले. आरएसएसचे स्कूल नेटवर्क विद्या-भारतीचे सचिव दिनानाथ बत्रा यांनी त्यावेळी या मंडळींना 'भारतीयांचे शत्रू : मार्क्स, मॅकौले व मदरशांची पिलावळ' म्हणून हिणवले व आपल्या पुस्तकात ४१ बदल करण्यासाठी सांगितले. एनसीईआरटी निदेशक इथवर बोलले की 'आम्ही कोणत्याही धर्माबद्दल काहीही पाठ्यपुस्तकात समाविष्ट करण्यापूर्वी धर्मतज्ज्ञांची सूचना घेऊ' (टाइम्स ऑफ इंडिया, ५ ऑक्टोबर २००१), मुरली मनोहर जोशी यांनी डिसेंबर महिन्यात पुस्तकांमध्ये काहीही सामील करण्यापूर्वी सर्व संबंधित धर्म प्रमुखांद्वारे ते समाविष्ट करावे असे सांगितले. (हिंदुस्थान टाइम्स, ४ डिसेंबर २००१), डॉ. बत्रा यांना शैक्षणिक अनुसंधान एवं प्रशिक्षण परिषद (एनसीईआरटी)चे सदस्यत्व बहाल करण्यात आले.

तत्कालीन एनसीईआरटी निदेशक जे.एस. राजपूत यांनी या ख्यातनाम इतिहासकारांची पुस्तके बाजूला सारून निनावी अशा एस. पी. जैन, के. एस. लाल, लोकेश चंद्र, जी. एस. पांडे यांसारख्या संघ परिवाराशी जवळीक असलेल्या इतिहासकारांना पुढे आणले. एनडीएच्या शासनकाळात इतिहासकारांची कुठलीच समिती किंवा त्यांची सूचना न घेता मनमानी बदल करण्यात आले. जातीयवादी राजकारणाचा पुरस्कार करणाऱ्या

इतिहासकारांचा समावेश करण्यात आला, ज्यांची शैक्षणिक उंची प्रश्नांच्या घेऱ्यात होती, त्यांचे कुठलेच योगदान अथवा संशोधनपर काम नव्हते. या लोकांची नावे पुष्कळ दिवसांपर्यंत गुलदस्त्यातच ठेवण्यात आली किंबहुना वाद टाळण्यासाठी ती लपविण्यात आली.

भारताच्या आंतरराष्ट्रीय ख्यातीप्राप्त व पुरोगामी मानल्या जाणाऱ्या इतिहासकारांनी याचा प्रखर विरोध करणे सुरू केले. भारतीय समाज हजारो धार्मिक, जातिय आणि मान्यतांचा गटसमूह आहे. जर इतिहासकार नेहमी या सर्व गटांच्या धार्मिक भावनांच्या संवेदनशीलतेला घाबरत रहातील तर सार्थक आणि खरा इतिहास लिहिणे कधीच शक्य होणार नाही. हे इतिहासकार नेहमीच साधूसंत, धर्माचार्य, शंकराचार्य, इमाम, उलेमा, ग्रंथी, बिशप या लोकांसोबतच ब्राह्मण, जाट, गुज्जर, मराठा, दलित अशा असंख्य जाती व संप्रदायांच्या निशाणावर राहिले आहेत. इतिहासाचे पुनर्लेखन भाजपशासित राज्यांमध्ये लागू करण्यात येत असलेला प्रमुख अजेंडा राहिला आहे.

बिपीन चंद्र 'हिस्टॉरिकल ब्लंडर'(ऐतिहासिक घोडचूक) शीर्षक लेखात लिहितात - 'जातीयवाद हा भीती, असुरक्षितता, फुटीरता व सर्वात वर विविध धर्मांच्या अनुयायांदरम्यान विरोध आणि शत्रूतेवर अवलंबून असतो. जातियवादी लोक याच उद्देशाने इतिहासाचा वापर करतात. जातियवादी व्याख्येनुसार भारतातच जातीयवाद मजबूत करण्यात येत आहे. इतिहासाबाबत सांप्रदायिक दृष्टीकोनाचा उपयोग जातीयवादाचे औचित्य योग्य ठरविण्यासाठी केला जातो आणि आपण देखील जातीयवादी चेतना पसरविण्याचे प्रमुख साधन बनून जातो.

आज डॉ. दिनानाथ बत्रा यांची भारतीय संस्कृती, इतिहास, चरित्र निर्माण, गणित आणि अन्य विषयांवरची पुस्तके ३० जून २०१४ रोजी एक परिपत्रक काढून गुजरातचे शिक्षणमंत्री भूपेंद्रसिंह चुडासामा यांनी तिथल्या सर्व ४२,००० प्राथमिक आणि माध्यमिक शाळांसाठी अनिवार्य करण्यात आली. वाढदिवसानिमित्त मेणबत्ती जाळणे 'पश्चिमी सभ्यता' असल्याने त्याला निषिद्ध करणे आणि पाकिस्तान, अफगाणिस्तान, बांगला देश, तिबेट, नेपाळ, भूतान, श्रीलंका आणि म्यानमार हे अखंड भारताचे भाग असल्याचे ह्या शाळांमध्ये 'अनुपूरक साहित्य' म्हणून शिकवलं जातं.

बिपीन चंद्र मानायचे की, - 'इतिहासकाराचे काम सोपे नाही. एका बाजूला त्याला स्वत:चे हेर-फेर होण्यावाचून व स्वत: ते हेर-फेर करण्यापासून वाचवावं लागतं, तर दुसरीकडे तो स्वत:ला समाजापासून कापून वेगळं ठेवू शकत नाही. एका तऱ्हेने तो 'इतिहास व समाजाचे उत्पादन' असतो. तो आपल्या व आपल्यावेळच्या अपेक्षा व निराशा यांना व्यक्त करत असतो. परंतु त्यावर अचूकता, सचोटी आणि निर्भिडतेने शास्त्रीय कठोरतेच्या मागण्या पूर्ण करायची जबाबदारीदेखील असते.' इतिहासांच्या पुस्तकांवर आरएसएससारख्या धर्मांध संघटनांचे हल्ले वाढणार हे आपण सर्व ओळखून आहोत. अशावेळी बिपीन चंद्र यांच्यासारख्या नेहमीच सक्रीय रहाणाऱ्या इतिहासकाराचं जाणं मनाला अतिशय जास्त लागणारी व न परवडणारी घटना आहे.

□□□

## (मोदी सरकारविरुद्ध संघर्ष... पान १२ वरून)

आव्हानांचा परामर्श घेतला. ठाणे-पालघर जिल्ह्यात जनवादी महिला संघटनेची सभासदसंख्या २२,३८९ आहे आणि ७ तालुक्यांतील सुमारे १५० गावांत ही सभासदसंख्या पसरली आहे किंवा त्या गावांत संघटनेचे संपर्क आहेत. वर उल्लेख केलेल्या अनेक ज्वलंत आर्थिक प्रश्नांबरोबरच, महिला व मुलींविरुद्ध वाढत्या हिंसाचाराच्या निषेधार्थ एका व्यापक जनजागृती मोहिमेची संघटनेने सुरुवात केली आहे.

मरियम म्हणाल्या की ही महिला अत्याचारांविरुद्धची मोहीम देशभर २३ जुलै या कॅप्टन लक्ष्मी सहगल यांच्या दुसऱ्या स्मृतीदिनापासून सुरू करण्यात आली आणि तिला लोकांकडून उत्तम प्रतिसाद मिळत आहे. या मोहिमेत या महत्त्वाच्या सामाजिक प्रश्नाविषयी व्याख्याने, महिला व विद्यार्थ्यांसोबत चर्चासत्रे, महिलांवरील अत्याचार थांबविण्याची शपथ घेणे, आणि प्रतिष्ठेपायी हत्या रोखण्यासाठी एक सर्वंकष कायदा व्हावा यासाठी सह्यांची मोहीम राबविणे असे मार्ग वापरले जात आहेत. त्यासाठी जनवादी महिला संघटना आणि एसएफआय यांनी मिळून माध्यमिक शाळा, महाविद्यालये, आश्रमशाळा आणि गावे यांत ही मोहीम राबविली आहे. २८ सप्टेंबर या अमर शहीद भगतसिंगांच्या जयंती दिनी या मोहिमेची सांगता होईल. आजवर ३५००हून अधिक विद्यार्थी-विद्यार्थिनी आणि ७०००हून अधिक महिलांनी या मोहिमेत भाग घेतला आहे. या मोहिमेसाठी २०,००० पत्रके छापण्यात आली आहेत. धुंदलवाडीच्या ह्या सभेतही हजारो महिलांनी अशा अत्याचारांचा सामना करण्याची शपथ घेतली.

आगामी विधानसभेच्या निवडणुका आदिवासींच्या हक्कांचे रक्षण करण्याची, आणि विशेषत: महिलांच्या अधिकारांचे जतन करण्याची एक महत्वाची लढाई असेल अशा मरियम म्हणाल्या. जमीन, पाणी, जंगल, अन्न, रोजगार हे आदिवासी महिलांसाठी अत्यंत कळीचे प्रश्न आहेत. पण काँग्रेस-राष्ट्रवादी काय आणि भाजप-शिवसेना काय, यांच्या राज्यात आहेरेंसाठी 'विकास' आणि नाहीरेंसाठी 'भकास' अशीच अवस्था राहिली आहे. म्हणूनच या दोन्ही प्रस्थापितांना महिलांनी नाकारले पाहिजे. आरएसएस-विहिंप-भाजप-सेनेसारख्या धर्मांध शक्तींचा धोका मोदी सरकार सत्तेवर आल्यापासून लक्षणीय प्रमाणात वाढला आहे. पालघर आणि ठाणे जिल्ह्यातील डहाणू, विक्रमगड, पालघर, बोईसर आणि शहापूर विधानसभा मतदारसंघांत मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी जनवादी महिला संघटनेने गावागावात आणि पाड्यापाड्यांत शेकडो सभा घेण्याचे आणि नेटाने प्रचार करण्याचे त्यांनी शेवटी आवाहन केले.

या सभेला पक्षाचे जिल्हा सचिव आमदार राजाराम ओझरे, किसान सभेचे राज्य सहसचिव बारक्या मांगात, डीवायएफआयचे जिल्हा सचिव रामदास सुतार यांनी शुभेच्छा दिल्या. जनवादीच्या राज्य सचिवमंडळ सदस्या रसीला धोडी आणि संगीता ओझरे यांनी सभेस संबोधित केले. सभेच्या अध्यक्षस्थानी जनवादीच्या जिल्हा अध्यक्षा लहानी दौडा या होत्या. बोईसर विधानसभेसाठी माकपच्या २७ वर्षे वयाच्या तरुण उमेदवार जनवादीच्या राज्य कमिटी सदस्या हिना वनगा यांनीही सभेस संबोधित केले.

धुंदलवाडीची ही जाहीर सभा यशस्वी करण्यासाठी ठाणे-पालघर जिल्ह्यातील जनवादी महिला संघटनेने गाववार सभा घेतल्या आणि ५,००० पत्रकांचे वाटप केले. किसान सभा व डीवायएफआयच्या कार्यकर्त्यांनीही या सभेच्या यशासाठी चांगली मदत केली. पुढील महिन्यात येणाऱ्या राजकीय लढाईसाठी तन-मन-धनाने काम करण्यास या सभेने सर्व महिलांना मोठ्या प्रमाणात प्रोत्साहित केले. आणि तेच या सभेचे खरे यश होते.

□□□

# डहाणू : धर्मांध मोदी सरकारविरुद्ध जोरदार संघर्षाचा निर्धार
## जनवादी महिला संघटनेतर्फे ५००० महिलांची जिल्हाव्यापी सभा

**मरियम ढवळे**

त्या दिवशी पडत असलेला धुवाँधार पाऊसही हजारो महिलांचा उत्साह आणि निर्धार दडपू शकला नाही. या संततधार पावसावर मात करून २७ ऑगस्ट २०१४ रोजी अखिल भारतीय जनवादी महिला संघटनेच्या ठाणे-पालघर जिल्हा कमिटीने दिलेल्या हाकेनुसार डहाणू तालुक्यात धुंदलवाडी गावात सोमय्या ट्रस्ट हॉस्पिटल सभागृहात महिला एकत्र येण्यास सुरुवात झाली.

तरुण आणि वयस्कर महिला, रंगीबेरंगी आकर्षक साड्या नेसून ट्रक, टेम्पो, जीप, बस आणि रिक्षांनी स्वखर्चाने येत होत्या. आजूबाजूच्या गावांतून लहान मुले कडेवर घेऊन शेकडो महिला चालत येत होत्या. दुपारी १ वाजेपर्यंत ५,००० महिलांची संख्या पार झाली. त्यातील बहुसंख्य आदिवासी महिला होत्या.

१ ऑगस्ट २०१४ रोजी नव्याने विभाजित झालेल्या पालघर आणि ठाणे जिल्ह्यांच्या जव्हार, मोखाडा, विक्रमगड, डहाणू, तलासरी, पालघर, वाडा आणि शहापूर या सर्व तालुक्यांतील घनदाट जंगलातून, डोंगरदऱ्यांतून आणि कडेकपारीतून या महिला आल्या होत्या. डहाणू व तलासरी तालुक्यातील महिलांचा या सभेत साहजिकच सर्वाधिक वाटा होता.

या दोन्ही तालुक्यांना मध्यवर्ती असलेले, मुंबई-अहमदाबाद महामार्गावर असलेले धुंदलवाडी गाव या सभेसाठी निवडण्यात आले होते. येथील आता जवळजवळ बंद पडलेल्या सोमय्या ट्रस्ट हॉस्पिटलच्या विशाल गच्चीवर ही सभा भरविण्याची मूळ कल्पना होती. पण मुसळधार पावसामुळे ते शक्य झाले नाही आणि ऐन वेळी तळ मजल्यावरील दोन मोठे हॉल आणि सर्व व्हरांडा महिलांनी गच्च भरून गेले. मुंगी शिरायला जागा नसणे ही म्हण त्या दिवशी अक्षरश: खरीच ठरली.

या महिला रॅलीचे राजकीय महत्त्व म्हणजे पुढील महिन्यात ऑक्टोबरमध्ये होऊ घातलेल्या महाराष्ट्र राज्य विधानसभा निवडणुकांची पूर्वतयारी म्हणून तिचे आयोजन करण्यात आले होते. महाराष्ट्र डाव्या लोकशाही समितीचा भाग म्हणून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्ष ज्या २०-२२ विधानसभा जागा लढविणार आहे, त्यापैकी ५ जागा - डहाणू, विक्रमगड, पालघर, बोईसर आणि शहापूर - या पालघर आणि ठाणे जिल्ह्यांतील आहेत.

या सभेच्या प्रमुख वक्त्या अ. भा. जनवादी महिला संघटनेच्या राष्ट्रीय उपाध्यक्षा सुधा सुंदररामन या होत्या. मुसळधार पावसावर मात करून इतक्या प्रचंड प्रमाणात या सभेसाठी दूरवरून आल्याबद्दल त्यांनी महिलांचे प्रथम मन:पूर्वक अभिनंदन केले. यातून चळवळ आणि संघटनेवरील महिलांची अढळ निष्ठा व्यक्त होते असे त्या म्हणाल्या.

'अच्छे दिन'ची धादांत खोटी आश्वासने देणाऱ्या भाजपच्या मोदी सरकारवर सुधा यांनी घणाघाती हल्ला चढविला. या सरकारच्या पहिल्या तीन महिन्यांत गोरगरीब, श्रमिक, दलित, आदिवासींच्या हालअपेष्टा उलट मोठ्या प्रमाणात वाढल्या असल्याचे त्या म्हणाल्या. आदिवासी मुलां-मुलींचे कुपोषणामुळे मृत्यू अनेक राज्यांत वाढत आहेत. अन्नसुरक्षा कायद्याच्या अंमलबजावणीबाबत चालढकल सुरू आहे. जीवनावश्यक वस्तूंची महागाई जशी काँग्रेसच्या राज्यात वाढत होती, तशीच ती भाजपच्या राज्यातही वाढत आहे. कारण दोहोंच्या आर्थिक धोरणांत कोणताच फरक नाही. वनाधिकार कायदा आणि राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी कायदा यांचा अमलही अत्यंत असमाधानकारक असून लाखो आदिवासींना वनजमिनीवरील कायदेशीर हक्क आणि किमान वेतनानुसार रोजगार मिळालेला नाही. महिला आरक्षण विधेयकही बासनात गुंडाळून ठेवले गेले आहे.

महिला आणि मुलींवरील वाढत्या हिंसाचाराविरुद्ध जनतेला संघटित करण्याच्या गरजेवर सुधा यांनी भर दिला. प्रतिष्ठेपायी हत्यांचे प्रमाण अलीकडे लक्षणीय प्रमाणात वाढत आहे. हिंदुत्वाच्या धर्मांध शक्ती 'प्रेम जिहाद'चा नारा उचलून अल्पसंख्यांकांना लक्ष्य करत आहेत आणि त्यातून जनतेत ध्रुवीकरण घडवून आणत आहेत. त्यातून महिलांवरील हल्ले जास्तच वाढणार आहेत. महिलांविषयीच्या सर्व प्रकारच्या सरंजामी आणि पुरुषप्रधान प्रवृत्तींविरुद्ध तसेच धर्मांधता, जातपातवाद आणि सामाजिक जुलुमांच्या सर्व प्रकारांविरुद्ध संघर्ष तीव्र करण्याची त्यांनी हाक दिली. हे सर्व साध्य करण्यासाठी आपल्या लढ्यांची व्यापकता आणि तीव्रता अनेकपट जास्त वाढविली पाहिजे हे त्यांनी अधोरेखित केले. अखेरीस, आगामी विधानसभा निवडणुकीच्या राजकीय संघर्षात भाजप-शिवसेना युती तसेच काँग्रेस-राष्ट्रवादी आघाडी यांचा पराभव करून मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या उमेदवारांना विजयी करण्याचे बुलंद आवाहन त्यांनी केले.

जनवादी महिला संघटनेच्या राज्य सचिव सोन्या गिल यांनीही सभेस संबोधित केले. मोदी सरकार जमिनीच्या कायद्यांत करत असलेल्या प्रतिगामी बदलांचा त्यांनी उल्लेख केला. महाराष्ट्रातील शेतकरी आणि आदिवासींना या जमिनीवरून हाकलून लावून श्रीमंतांसाठी हॉटेल्स व रिझॉर्ट्सची उभारणी होत आहे आणि त्यामुळे गरीब शेतकऱ्यांचे कफल्लकीकरण होत आहे. अन्नसुरक्षा कायद्याची अंमलबजावणी करताना लाखो गोरगरीब कुटुंबांना वगळण्यात आले आहे. पालघर-ठाणे जिल्ह्यात ह्या व इतर प्रश्नांवर महिला जो सातत्याचा आणि आक्रमक लढा देत आहेत, त्याबद्दल त्यांनी महिलांचे अभिनंदन केले.


धनगर समाजाचा आदिवासींमध्ये समावेश करण्यासाठी त्यांना उसकावणाऱ्या भाजप आणि राष्ट्रवादी काँग्रेसवर सोन्या यांनी टीका केली आणि स्वत:च्या स्वार्थी निवडणुकीच्या उद्दिष्टासाठी श्रमिक जनतेत विभाजन करत असल्याचा त्यांनी आरोप केला. महाराष्ट्रात धनगर समाजाला भटके विमुक्त म्हणून शिक्षण व नोकऱ्यांत ३.५ टक्के आरक्षण असून, याउलट सर्व आदिवासी जमातींना मिळून फक्त ७ टक्के आरक्षण आहे. आगामी विधानसभा निवडणुकीत जोरदार काम करून डाव्या उमेदवारांना विजयी करण्यासाठी जोरदार प्रयत्न करण्याचे त्यांनी आवाहन केले.

जनवादी महिला संघटनेच्या राज्य अध्यक्षा मरियम ढवळे यांनी पालघर-ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागातील महिला चळवळीसमोरील

*(पान ११ पहा)*

# डॉ. दाभोलकर यांच्या पहिल्या हौतात्म्यदिनी पुण्यात भव्य मोर्चा

*आम्ही प्रकाशबीजे रूजवीत चालतो*
*वाटा नव्या युगाच्या रूळवीत चालतो।।*
*जे शिल्पकार सारे येत्या नव्या युगाचे*
*त्यांची स्मृती मनाशी जागवीत चाललो।।*



हे अंनिस लोकरंगमंचाचे गीत सकाळी ११ वाजता महर्षी विठ्ठल शिंदे पुलावर एकसाथ हजारो कार्यकर्ते गात होते. डॉ. नरेंद्र दाभोलकरांच्या खुनास एक वर्ष पूर्ण झालेनिमित्त राज्यातील हजारो कार्यकर्ते एकत्र येऊन डॉक्टरांना आदरांजली वाहत होते. त्यांना सामाजिक कार्यकर्ते सिने, नाट्य कलावंतही साथ देत होते. चळवळीची विविध गाणी सादर करून डॉक्टरांना आदरांजली वाहण्यात आली. त्यानंतर पुलावरून भव्य मोर्चास सुरुवात झाली. मोर्चामध्ये डॉ. बाबा आढाव, डॉ. सदानंद मोरे, सुभाष वारे, विद्याताई बाळ, सिनेअभिनेते नसिरुद्दिन शहा, रत्ना पाठक-शहा, अमोल पालेकर, नागनाथ मंजुळे, सोनाली कुलकर्णी, संध्या गोखले, गिरीश कुलकर्णी, मुक्ता मनोहर, अजित अभ्यंकर, किरण मोघे, नितीन पवार, विलास वाघ, ज्येष्ठ पत्रकार अनंत दिक्षित, संजय आवटे, आशिष खेतान, अतुल पेठे, भाई वैद्य, अंनिसचे राज्य कार्याध्यक्ष अविनाश पाटील, मिलिंद देशमुख, संजय बनसोडे, डॉ. हमीद दाभोलकर, मुक्ता दाभोलकर इ. मान्यवर सहभागी झाले होते. 'आवाज दो-हम एक है!' 'फुले-शाहू-आंबेडकर आम्ही सारे दाभोलकर' इ. घोषणा दिल्या जात होत्या. माणूस मारता येतो-विचार मारता येत नाही, विवेकाचा आवाज यापुढेही दुमदुमत ठेवू इ. आशयाचे फलक कार्यकर्त्यांनी हातात धरले होते. खुन्यांचा शोध न लावणाऱ्या पुणे पोलिसांचा व शासनाचा कार्यकर्ते घोषणा देऊन धिक्कार करत होते. मोर्चा पुणे महानगरपालिकेच्या आवारातील महात्मा फुले यांच्या पुतळ्याजवळ पोचल्यानंतर नसिरुद्दिन शहा यांनी महात्मा फुले यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी त्यांनी प्रसारमाध्यमांशी संवाद साधला. ते म्हणाले, डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी समाजाला पुढे नेणारा विचार दिला. त्यांची हत्या होणं ही अत्यंत वेदनादायी घटना आहे. त्याहीपेक्षा संतापजनक म्हणजे एक वर्षानंतरही त्यांच्या खुन्यांचा शोध अजूनही लागला नाही. खरं तर सरकारसाठी ही मोठी शरमेची बाब आहे. त्याचा मी तीव्र शब्दात निषेध व्यक्त करतो. मी आज यासाठीच मोर्चात सहभागी झालो आहे. इतकंच नव्हे तर डॉक्टरांचा विचार पुढे नेण्यासाठी जे जे मला करता येणं शक्य आहे, ते ते मीही करीत राहीन. विज्ञाननिष्ठ, विवेकवादी समाज घडविण्यासाठी अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या पाठीशी खंबीरपणे मी उभा राहणार आहे. यानंतर डॉ. बाबा आढाव यांनी महात्मा फुले यांचा 'सत्य सर्वाचे आदिघर' हा अखंड म्हटला. त्यानंतर मोर्चा पुढे अलका टॉकीज चौकातून म्हात्रे पूलमार्गे एरंडवणेत पोचला, तेथील मनोहर मंगल कार्यालयात मोर्चाचा समारोप होऊन निषेध सभेची सुरुवात झाली. या निषेध सभेत मुक्ता मनोहर म्हणाल्या की, आज पुणे मनपाच्या ५०० सफाई कामगारांना अर्धा दिवस सुट्टी देऊन मोर्चात सहभागी करून घेतले आहे. येथून पुढे कामगार चळवळीत फक्त कामगारांच्या पगारवाढीचा विचार करण्याबरोबरच त्यांना पुरोगामी विचारसरणी देण्याची अत्यंत गरज आहे. त्यासाठी अं.नि.स.ने कामगार, कष्टकरी यांना कार्यक्रम द्यायला हवा. यानंतर किरण मोघे यांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीलाच खुनी न शोधणाऱ्या शासनाचा तीव्र शब्दात धिक्कार व्यक्त केला व त्यांच्या धिक्कारास सभागृहाने टाळ्यांच्या गजरात साथ दिली. त्या पुढे म्हणाल्या की, आता आपली सर्व ताकद एकवटावी लागेल. कारण आता परिस्थिती गंभीर होत चालली आहे.

यानंतर प्रा. सुभाष वारे यांनी आपल्या भाषणात राजकीय नेत्यांवर टीकास्त्र सोडले. ते म्हणाले की, महाराष्ट्रातील जाणते राजे 'आम्हाला एवढ्या जागा सोडा, तुम्ही एवढ्या जागा घ्या' अशा जागा वाटपाच्या चर्चेत दंग आहेत. त्यांना दाभोलकरांच्या खुन्यांना पकडण्यात रस नाही. डॉ. दाभोलकरांचे जाणे हे इतके मनाला लागले आहे की, मन कितीही विवेकी केले तरी भावनांना आवर घालणे अशक्य होत आहे. राज्यघटनेतील धर्मस्वातंत्र्याची मर्यादा हे कलम सर्वांपर्यंत पोचविणे आता गरजेचे झाले आहे. फँड्री चित्रपटाचे दिग्दर्शक नागनाथ मंजुळे म्हणाले की, हा देवाधर्माचा बाजार टिकावा म्हणून इथली व्यवस्था जाणीवपूर्वक प्रयत्न करते आहे. तरुणांना दहीहंडीसारख्या धार्मिक उत्सवात गुंतवून त्यांचे खच्चीकरण सुरू आहे. मी लहानपणापासून नास्तिकच आहे. प्रत्यक्ष चळवळीत नसलो तरी मी अंनिसचाच कार्यकर्ता आहे. फँड्रीतील जब्याच्या वडिलांना असलेल्या जटा सोडविण्यासाठी अंनिसची मदत हवी आहे.

आपल्या शेकडो रिक्षाचालकांसह मोर्चात सहभागी झालेले रिक्षा पंचायतीचे तरुण कार्यकर्ते नितीन पवार म्हणाले की, पुण्यातील रिक्षावाल्यांनी आपल्या रिक्षास लिंबू मिरची बांधणे बंद करून डॉक्टरांना आदरांजली वाहिली आहे. रिक्षा स्टॉपवर होणाऱ्या सत्यनारायण पूजाही अलिकडे कमी होताना दिसतात. दाभोलकरांचा विचार कष्टकऱ्यांमध्ये रुजविण्यासाठी आम्ही पुढे प्रयत्न करू. ज्येष्ठ पोलीस अधिकारी सुरेश खोपडे म्हणाले की, दाभोलकरांच्या खून तपासात प्लँचेटचा वापर केला गेला यावर गृहमंत्री आर.आर. पाटील, पुण्याचे पोलीस आयुक्त सतीश माथुर यांनी अजूनही कारवाई का केली नाही ? अजून पोलीस दलाला इंग्रज काळातलेच ट्रेनिंग दिले जाते. त्यांना मालमत्तासंबंधी घडलेले गुन्हे शोधण्याचे ट्रेनिंग दिले जाते. पोलिसांना सामाजिक जडणघडण, चळवळी इत्यादींबद्दलचे ट्रेनिंग दिले जात नाही. त्यामुळे पोलीस डॉ. दाभोलकरांच्या खुन्यांना पकडू शकले नाहीत. त्यामुळे आता पोलिसांचे ट्रेनिंग बदलण्याची गरज आहे. नर्मदा व लवासा आंदोलनाच्या कार्यकर्त्या सुनीती सु. र. म्हणाल्या की, डॉक्टरांना आता आदरांजली नव्हे तर कार्यांजली वाहण्याची वेळ आली आहे. चळवळीने जागतिकीकरण, खाजगीकरण यांच्याविरोधात आता भूमिका घेणं गरजेचं आहे.

'मिळून साऱ्याजणी' या मासिकाच्या संपादिका व ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या विद्याताई बाळ उपस्थित मुलींना उद्देशून म्हणाल्या की 'तू बदलेगी

**(पान १४ पहा)**

# सोलापूर एसएफआय : डॉ. दाभोलकरांना मूकनाट्याद्वारे श्रद्धांजली

पुरोगामी विचारांचे कार्यकर्ते व अंनिसचे संस्थापक अध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या प्रथम स्मृतीदिनानिमित्त त्यांच्या एकूणच कार्याला उजाळा देण्यासाठी स्टुडंट्स फेडरेशन ऑफ इंडियाच्या सोलापूर जिल्हा कमिटीच्या वतीने पार्क चौक, चार पुतळा व चांदणी चौक येथे मूकनाटिका सादर करून त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली वाहण्यात आली. २० ऑगस्ट २०१३ रोजी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची पुणे येथे हत्या करण्यात आली होती. या घटनेला एक वर्ष पूर्ण होऊन देखील शासन व पोलीस प्रशासन यांना अद्यापही त्यांच्या मारेकऱ्यांपर्यंत पोहचता आले नाही ही दुर्दैवाची बाब आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांचे कार्य व विचार अखंडपणे सुरू ठेवण्यासाठी एस.एफ.आय.तर्फे मूकनाटिका सादर करण्यात आली. या मूकनाटिकेमध्ये मूल न होणे, अंगात येणे, भूतबाधा, करणी-चेटूक, जादूटोणा या विरोधात डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी जे कार्य केले त्याला उजाळा देत या सर्व घटकांना आळा बसावा हा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर झेंडेकर म्हणाले की, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांनी अंनिसच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा नाहीशी करण्यासाठी आपलं अवघं जीवन वाहून दिलं. त्याचबरोबर त्यांनी विज्ञाननिष्ठ समाज घडावा यासाठी अहोरात्र प्रयत्न केले. खेडोपाडी जाऊन त्यांनी अंधश्रद्धेविरोधी वेगवेगळे प्रयोग केले तसेच विवेक वाहिनीमधून महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचे प्रबोधन करण्याचं काम त्यांनी केलं देश उभारणीतलं त्यांचं हे योगदान काही समाजकंटकांना पटलं नाही म्हणून त्यांनी डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या घडवून आणली. पुढे बोलताना ते म्हणाले की, एस.एफ.आय.चा हे मूकनाट्य सादर करण्यामागचा उद्देश आहे की, त्यांच्या कार्याला उजाळा मिळावा व त्यांचे विचार लोकांपर्यंत पोहोचावेत व त्यातून विज्ञान व विवेकनिष्ठ समाज निर्माण व्हावा.

कार्यक्रमाच्या शेवटी राज्य सचिव दत्ता चव्हाण आपले मनोगत व्यक्त करताना म्हणाले की, आज जरी डॉ. दाभोलकर आपल्यात नसले तरी त्यांचे कार्य व विचार मरणार नाहीत, आज त्यांच्यामुळेच जादूटोणाविरोधी कायदा पारित करण्यात आला. त्यांच्यामुळेच आज अंधश्रद्धेवर आळा बसला आहे. डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या मारेकऱ्यांना पकडून त्यांना फाशीची शिक्षा दिली पाहिजे असे ते म्हणाले. कार्यक्रमाची सुरुवात डॉ. नरेंद्र दाभोलकर यांना अभिवादन व श्रद्धांजली देऊन केली व समारोप अंधश्रद्धाविरोधी घोषणांनी करण्यात आला.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा सचिव नम्रता निली, राज्य सचिवमंडळ सदस्या मीरा कांबळे, अनिल चौगुले, विजय एडके, राहुल जाधव, अमोल केंदळे, राहुल लोखंडे, रोशन शिरसट, एकनाथ काळे, पूजा कांबळे, शामसुंदर आडम, शकील बिराजदार, अर्चना, सय्यद वसीम अक्रम, अजय मुदगल आदींनी परिश्रम घेतले.

**– नम्रता निली**

# डॉ. दाभोलकर हत्याप्रकरणी तलासरीत मोर्चाद्वारे सरकारचा निषेध

अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे अध्यक्ष डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची हत्या होऊन वर्षे उलटले, तरी त्यांच्या मारेकऱ्यांना शोधण्यात, अटक करण्यास असमर्थ ठरलेल्या महाराष्ट्र सरकार आणि पोलीस प्रशासनाचा तलासरी, जिल्हा ठाणे येथे २० ऑगस्ट रोजी आयोजित केलेल्या मोर्चाद्वारे निषेध केला.

तालुक्यातील आदिवासी प्रगती मंडळ संचलित कॉ. गोदावरी शामराव परुळेकर महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी तहसील कार्यालयावर मोर्चा नेला. 'नरेंद्र दाभोलकर अमर रहे' अशा घोषणा देत त्यांनी निषेध व्यक्त केला. दाभोलकरांच्या मारेकऱ्यांना लवकरात लवकर शोधून शिक्षा देण्याची मागणी करणारे निवेदन या वेळी तहसीलदारांना देण्यात आले. या वेळी संस्थाध्यक्ष माजी खासदार लहानू कोम, जिल्हा परिषद सदस्य बारक्या मांगात, महाविद्यालयाचे प्राचार्य बी. ए. राजपूत आणि प्राध्यापक उपस्थित होते.

**– प्राचार्य बी. ए. राजपूत**

## (हौतात्म्यदिनी पुण्यात मोर्चा... पान १३ वरून)

तो ही, ये जमाना बदलेगा' आम्ही सखी साऱ्याजणी आपल्या चळवळीच्या सोबत आहोत. दै. पुढारीचे संपादक संजय आवटे यांचे प्रेरणादायी भाषण झाले. ते म्हणाले की, 'माणूस मारल्यानंतर विचार संपविता येतो', ही सनातन्यांची अंधश्रद्धा डॉ. दाभोलकरांच्या खुनानंतर दूर झाली आहे. हत्येने विचार मारता येत नाही हे अंनिसने सिद्ध करून दाखविले आहे, दाभोलकरांचे विचार हे विरोधकांना घातक वाटत होते म्हणून त्यांना संपविले गेले. पण डॉक्टरांच्या समर्थकांना त्यांचे विचार महत्वाचे व आपले वाटणे गरजेचे झाले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त न्यायमूर्ती हेमंत गोखले म्हणाले की, 'डॉ. आंबेडकरांच्या हयातीत हिंदू कोड कायदा झाला, परंतु डॉ. दाभोलकरांना ते भाग्य लाभले नाही. दलितांना मंदिरात प्रवेश देणारा कायदा लागू झाल्यानंतर स्वामी नारायण मंदिराने या विरुद्ध कोर्टात धाव घेतली व आम्ही हिंदू नाही त्यामुळे हा कायदा आम्हास लागू पडत नाही, अशी भूमिका घेतली. १९६४ पर्यंत केस चालून स्वामी नारायण मंदिर दलितांना खुले करण्याचे आदेश दिले. दलितांना मंदिरामध्ये प्रवेश द्यावा लागतो म्हणून आम्ही हिंदू नाहीत म्हणणारे आज हिंदुत्वाचा जोरदारपणे पुरस्कार करतात हे अनाकलनीय आहे. डॉ. दाभोलकर हे माझे वैयक्तिक मित्र होते. त्यांचेनंतर चळवळीस जी मदत लागेल ती मी करण्याचे आश्वासन देतो.

प्लँचेट प्रकरणाचे स्टिंग ऑपरेशन करणारे दिल्लीतील पत्रकार आशिष खेतान म्हणाले की, गांधीजींच्या हत्येचा कट रचणाऱ्या पुण्यातच दाभोलकरांचा खून झाला आहे. वर्षभरातही पोलिसांना हत्येसंदर्भात कुठलेच धागेदोरे मिळू नयेत याबद्दल अनेकांना आश्चर्य वाटते. ज्या नियोजनाने हत्या करण्यात आली त्याचप्रमाणे सत्यावर पडदा टाकण्याचा काही शक्तींकडून प्रयत्न केला जात आहे. त्यामुळे वर्षभरातनंतरही सत्य बाहेर आले नाही. अर्थात डॉ. दाभोलकरांनी सुरू केलेला हा लढा थांबणार नाही. दाभोलकरांच्या सामाजिक बदलांचं वारं देशभर फिरत आहे. ते आता पुन्हा जोराने वाहू लागेल असा माहोल गेल्या वर्षभरात तयार झालेला मला पहायला व अनुभवयाला मिळाला आहे. पत्रकार म्हणून दिल्लीमध्ये जी काही समितीस मदत लागेल ती मी करण्यास नेहमीच तयार आहे. यानंतर मुक्ता दाभोलकर म्हणाल्या की, आज आमचा सामाजिक बाप गेला आहे, अशीच आपल्या सर्वांची भावना आहे.

यानंतर वाढत चाललेली नेत्यांची भाषणे यावर मार्मिक भाष्य करताना ज्येष्ठ संपादक अनंत दिक्षीत यांनी बाबा आढाव यांचा एक दाखला दिला. ते म्हणाले की, बाबांचे असे म्हणणे असते की, 'मोर्चा मोठा व भाषणे छोटी' हे वाक्य ध्यानात ठेवून मी दोन वाक्यात माझे विचार संपवितो. आज या विवेकजागराने पुरोगामी महाराष्ट्राचा इतिहास लिहिण्यास सुरुवात झाली आहे. यानंतर युनिसेफच्या माजी अधिकारी विजया चौहान, माजी पोलीस महानिरिक्षक अशोक धिवरे, प्रा. कपोले, अतुल पेठे इत्यादींची भाषणे झाली.

डॉ. हमीद दाभोलकरांनी आभार मानले व 'हम होंगे कामयाब!' या गीताने निषेध सभेचा समारोप झाला.

**– राहुल थोरात**